cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–५५ | गुरूवार दि.१४ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पंतप्रधानांच्या हुकूमशाही वर राहुल गांधींचा पत्र प्रपंच

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या प्रमुखाची निवड निवड करण्यासाठी पंतप्रधान सरन्यायाधीश आणि विरोधी पक्ष नेता अशी समिती नेमण्यात येते मात्र निवड करताना अचानक नावे समोर ठेवली जातात त्यांचे मूल्यांकन करण्याची वेळ समिती सदस्यांना येतच नाहीत मग या निवडीचा फार्स कशासाठी विरोधी पक्ष नेत्या चा वापर फक्त रबरी स्टॅम्प म्हणून करायचा आहे का देशामध्ये केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग पिंजऱ्यातील पोपट अशी प्रतिमा तयार झाली आहे असेच राहिले तर ही प्रतिमा गडद होण्यास वेळ लागणार नाही.

# केंद्र सरकारकडून खरीप हंगामाचे हमीभाव जाहीर!

## कापूस हमीभावात ५५७, सोयाबीनमध्ये ३८० तर तुरीत ४५० रुपयांची वाढ

दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी (ता.१३) खरिप हंगाम २०२६–२७ साठी १४ पिकांसाठी हमीभाव जाहीर केले आहेत. यंदाच्या खरिप हंगामावर एल निनोमुळे कमी पावसाचे सावट आहे. तर खत टंचाईदेखील भासत आहे. या पार्श्वभुमीवर केंद्र सरकार खरिपातील पिकांसाठी किती हमीभाव जाहीर करते? यात कोणत्या पिकाच्या हमीभावात भरीव वाढ केली जाते, याकडे लक्ष होते. खरिप हंगाम २०२६–२७ साठी सोयाबीनच्या हमीभावात केंद्र सरकारने ३८० रुपयांची वाढ केली आहे. तर कापसाचा हमीभाव ५५७ रुपयांनी वाढवला आहे. तुरीत देखील ४५० रुपयांची वाढ केली आहे. सूर्यफुलाच्या हमीभावात सर्वाधिक ६२२ रुपयांची वाढ केली असून मक्याचा हमीभाव केवळ १० रुपयांनी वाढवला आहे. एल निनोचे सावट आणि खत संकट असतानाही केंद्र सरकारने हमीभावात कमी वाढ केल्याचा सूर शेतकऱ्यांमधून उमटत आहे.



सरकारने सूर्यफुलाच्या हमीभावात सर्वाधिक ६२२ रुपयांची वाढ केली आहे. सूर्यफुलाचा हमीभाव ८ हजार ३४३ रुपयांवर पोचला आहे. केंद्र सरकारने भाताच्या हमीभावात केवळ ७२ रुपयांची वाढ केली आहे. ए ग्रेडच्या भाताचा हमीभाव २ हजार ४६१ रुपये झाला असून साधारण भाताचा हमीभाव २ हजार ४४१ रुपयांपर्यंत वाढवला आहे. भातासाठी उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा दिल्याचाही दावा सरकारने केला आहे. ज्वारीच्या हमीभावात ३२४ रुपयांची वाढ केली आहे. हायब्रीड ज्वारीला ४ हजार २३ रुपये आणि मालदांडी ज्वारीला ४ हजार ७३ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. बाजरीच्या हमीभावात १२५ रुपयांची वाढ केली असून २ हजार रुपये हमीभाव असणार आहे. तुरीच्या हमीभावात सरकारने यंदा ४५० रुपयांची वाढ केली आहे. तुरीला नव्या हंगामात ८ हजार ४५० रुपये हमीभाव असणार आहे. मुगाच्या हमीभावात केवळ १२ रुपयांची वाढ केली आहे. त्यामुळे मुगाचा हमीभाव ८ हजार ७८० रुपये झाला आहे. उडदाच्या हमीभावात ४०० रुपयांची वाढ केली असून ८ हजार २०० रुपयांवर पोचला आहे. केंद्र सरकारने सूर्यफुलाच्या हमीभावात सर्वाधिक ◀◀ पान २ वर

# बीडमध्ये पुन्हा क्षीरसागर विरुद्ध पंडित संघर्ष

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले असून गेवराईचे राष्ट्रवादीचे आमदार विजयसिंह पंडित आणि बीडचे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्यातील संघर्ष नव्या टप्प्यात पोहोचला आहे. विकासकामांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीवरून दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाली. त्यामुळे बीडमध्ये पुन्हा एकदा 'क्षीरसागर विरुद्ध पंडित' असा संघर्ष चर्चेचा विषय ठरला आहे.**



गेवराई मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी बीड आणि गेवराईमधील ११ विकासकामांबाबत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देत बैठक आयोजित केली होती. या बैठकीला बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी तीव्र आक्षेप घेतला. बीड मतदारसंघातील विकासकामांमध्ये हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, असा इशाराच त्यांनी दिला.आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले की, ''बीड मतदारसंघ हा माझा आहे. दोन वेळा जनतेने माझ्यावर विश्वास ठेवून मला निवडून दिले आहे. विकासाच्या नावाखाली माझ्या मतदारसंघातील योजना दुसरीकडे नेण्याचा प्रयत्न झाला तर मी त्याला विरोध करणारच.ते पुढे म्हणाले, ◀◀ पान २ वर

### पंडितांची क्षीरसागरावर अप्रत्यक्ष टीका

विकासकामांच्या मुद्द्यावरून आता हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.विजयसिंह पंडित यांनी संदीप क्षीरसागर यांच्या कुटुंबावरही अप्रत्यक्ष टीका केली.तुमचे कुटुंब गेली तीन दशके नगरपालिकेत सत्तेत होते. मग १६५ कोटी रुपयांच्या योजनेचे काय झाले?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### बीडमध्ये नव्या संघर्षाची सुरुवात

विजयसिंह पंडित यांचा बीड मतदारसंघातील वाढता हस्तक्षेप आणि त्यावर संदीप क्षीरसागर यांची तीव्र प्रतिक्रिया यामुळे बीडच्या राजकारणात नव्या संघर्षाला सुरुवात झाली आहे. आगामी स्थानिक आणि विधानसभा राजकारणात या संघर्षाचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.



# नीट पेपरफुटीची धग राज्यभर नगरसह देशातुन ५ ताब्यात

मुंबई– अ.नगर । प्रतिनिधी

वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा 'यूजी नीट'च्या पेपरफुटी प्रकरणात सोळा संशयितांमध्ये नाशिक व अहिल्यानगरातील दोघांचा समावेश आहे. कुरिअरद्वारे प्रश्नपत्रिकांचा संच पुढे पाठविणाऱ्या संशयित शुभम मधुकर खैरनार (वय २७, रा. इंदिरानगर) याला नाशिक शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, दुसरा संशयित अहिल्यानगरातील धनंजय ◀◀ पान २ वर

# पटेल- सुनिल तटकरे २२ आमदारांसह भाजपमधून लढणार- आ.रोहित पवार

पुणे । प्रतिनिधी

२२ आमदार घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिग्गज नेते सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे भारतीय जनता पक्षातून लढणार, असा सनसनाटी दावा राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी केला आहे. भाजपप्रवेश कधी करायचा, हे ठरणं बाकी असल्याचं रोहित पवार म्हणाले. ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते.



राष्ट्रवादीत पक्षांतर्गत वाद सुरु असतानाच, सुनेत्रा पवारांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात पटेल–तटकरेंची पदं वगळल्याची कारकुनी चूक काल समोर आली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी रोहित पवारांनी केलेल्या दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.''त्यांचं ठरलेलं आहे ऑलरेडी. २२ आमदारांचं ठरलं आहे. ◀◀ पान २ वर

# सोने–चांदी महागणार!

नवी दिल्ली । वृतसंस्था

सोने आणि चांदी खरेदी करणाऱ्या सर्वसामान्यांसाठी एक महत्त्वाची आणि काहीशी चिंतेची बातमी आहे. केंद्र सरकारने सोन्या–चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, याचे नवे दर आजपासून लागू झाले आहेत. या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारपेठेत ◀◀ पान २ वर

# विरोधी पक्षनेता रबर स्टॅम्प नाही सीबीआय संचालक निवडीवर राहुल गांधी आक्रमक

नवी दिल्ली । वृतसंस्था

पीएम मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत राहुल गांधी यांनी नवीन सीबीआय संचालकांच्या निवडीवर आपली असहमती दर्शवली. निवडीसाठी सादर केलेल्या ६९ उमेदवारांचा तपशील देण्यात आला नाही, असा आरोप त्यांनी केला. राहुल गांधी म्हणाले, ''सीबीआय संचालक निवड प्रक्रियेला केवळ एक औपचारिकता बनवण्यात ◀◀ पान २ वर

### सदानंद दाते यांच्या नावाची चर्चा

दरम्यान, महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या नावाची विशेष चर्चा असल्याची माहिती आहे. सदानंद दाते हे हे २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यादरम्यान दाखवलेल्या धाडसासाठी विशेष ओळखले जातात. त्यांनी प्रमुख म्हणूनही काम केले असून सध्या ते पोलीस महासंचालक आहेत. त्यांच्या नावाची चर्चेत विशेष दखल घेतली जात आहे. दाते यांच्यासह पराग जैन, शत्रूजित सिंह कपूर यांच्याही नावाची चर्चा आहे.

# निदा खानला आश्रय देणाऱ्या मतीनच्या घरावर बुलडोझर

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

नाशिक येथील बहुचर्चित 'कॉर्पोरेट जिहाद' आणि धर्मांतर प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिला आश्रय देणे चे माजी नगरसेवक मतीन पटेल यांना महागात पडले आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने आज पहाटे मोठी कारवाई करत मतीन पटेल यांचे घर आणि कार्यालयावर बुलडोझर चालवला आहे. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून राजकीय वातावरणही तापले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक पोलिसांनी धर्मांतर आणि छळवणुकीच्या आरोपाखाली फरार असलेल्या निदा खानला छत्रपती संभाजीनगरमधील नारेगाव भागातून अटक केली होती. तपासात असे समोर आले की, निदा खान ज्या घरात लपली होती, ते घर आणि मालमत्ता मतीन पटेल यांच्या मालकीची आहे. या घटनेनंतर प्रशासनाने मतीन पटेल यांच्या मालमत्तांची तपासणी केली असता, त्यांचे नारेगावमधील घर आणि १८०० चौरस फुटांच्या प्लॉटवरील कार्यालय अनधिकृत असल्याचे आढळले. महानगरपालिकेने त्यांना ७२ तासांची नोटीस बजावली होती. ◀◀ पान २ वर

# कॅनरा बँक घोटाळा प्रकरणी ५ आरोपींना अटक

जालन । प्रतिनिधी

**बदनापूर येथील कॅनरा बँक शाखेत सोन्याच्या दागिन्यांची चोरी आणि बनावट सोने ठेवून बँकेची सुमारे ७ कोटी ३१ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आणखी ५ आरोपींना अटक करण्यात आली असून, आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.**

या प्रकरणात बँकेचा अधिकारी, शाखा व्यवस्थापक आणि सुवर्ण मूल्यमापक या तिघांवर गुन्हा दाखल करून व्यवस्थापक विजेंद्र पाटणकर आणि सुवर्ण मूल्यमापक प्रवीण बुऱ्हाडे या दोघांना यापूर्वीच अटक करण्यात आलेली आहे. तर बँकेचा फरार अधिकारी संजय डोंगरे याच्यासह आणखी ५ जणांना आज अटक ◀◀ पान २ वर

# पंतप्रधानांच्या ताफ्यातील ५० टक्क्यांनी गाड्या कमी

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करावा आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, अशा जनतेला केलेल्या आवाहनांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधानांनी आपल्या अधिकृत ताफ्याचा आकार ५० टक्क्यांनी कमी केला आहे. याव्यतिरिक्त पंतप्रधानांनी 'वर्क फ्रॉम होम'चे आवाहन केले आहे.**

खर्चात कपात करण्याची ही मोहीम आता भाजपाशासित राज्यांमध्येही जोर धरू लागली आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री



डॉ. मोहन यादव यांसारख्या नेत्यांनीही आपापल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.अलीकडील देशांतर्गत दौ–यांदरम्यान या उपाययोजनेची अंमलबजावणी करण्यात आली. वाहनांची एकूण संख्या कमी करण्यात आली असली तरीही आवश्यक सुरक्षा व्यवस्था एसपीजीच्या नियमावलीनुसार काटेकोरपणे कायम ठेवण्यात आली ◀◀ पान २ वर

# सुप्रीम कोर्ट ; घरात एक दिवा लावला तरी पुरेसा श्रद्धा सिद्धीसाठी मंदिरात जाण्याची गरज नाही

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**श्रद्धा सिद्ध करण्यासाठी हिंदूंनी मंदिरात जाण्याची गरज नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. ''हिंदुत्व ही जगण्याची पद्धत आहे. श्रद्धा सिद्ध करण्यासाठी वारंवार मंदिरात जाणे किंवा विधी करणे बंधनकारक नाही. श्रद्धा आहे हे सिद्ध करायला घरात एक दिवा पेटवला तरी पुरेसे आह', असे सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी स्पष्ट केले. धार्मिक स्थळांवर महिलांबरोबर होणा–या भेदभावाशी निगडीत याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले.**



सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यासह नऊ न्यायाधीशांचा समावेश असलेल्या घटनापीठाने धार्मिक स्थळांवर महिलांबरोबर होणा–या भेदभावाशी निगडीत याचिकेची सुनावणी घेतली. यामध्ये केरळमधील सबरीमाला मंदिराचाही समावेश होता. यासह दाऊदी बोहरा आणि विविध धार्मिक मान्यता आणि प्रथांचा या याचिकेत समावेश करण्यात आला आहे, असे वृत्त पीटीआय या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे. सुनावणीच्या १५ व्या दिवशी वकील डॉ. जी. मोहन गोपाळ यांनी धार्मिक समुदायातून सामाजिक न्यायाची मागणी केली जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला.'हिंदू धर्माला एक धार्मिक श्रेणी म्हणून परिभाषित केले गेले होते. त्यानंतर, १९६६ मध्ये जो धर्म आणि तत्त्वज्ञानाच्या सर्व बाबींमध्ये वेदांना सर्वोच्च प्रमाण मानतो, तोच खरा हिंदू आहे, ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### सोनिया गांधी यांची तब्येत बिघडली

नवी दिल्ली : काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांना गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली.एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, एका किरकोळ शस्त्रक्रियेसाठी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले असून ही शस्त्रक्रिया नेमकी कशासाठी करण्यात येणार आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.सोनिया गांधी यांना रुग्णालयात दाखल केल्याचे वृत्त समजताच काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

### बारामतीत पुन्हा विमान दुर्घटना..!

पुणे : जिल्ह्यातील बारामती तालुक्यात पुन्हा एकदा गोजुबावी गावाच्या हद्दीत रेडबर्ड कंपनीचे प्रशिक्षणासाठी वापरले जाणारे विमान कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने या अपघातात वैमानिक सुरक्षित असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हे विमान प्रशिक्षणासाठी उड्डाण करत असताना अचानक तांत्रिक बिघाड झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र नेमके विमान कशामुळे कोसळले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिस आणि संबंधित यंत्रणा तातडीने दाखल झाल्या.

### अमोल मिटकरी सुनेत्रा पवारांच्या भेटीला

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे आक्रमक आमदार अमोल मिटकरी आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी 'देवगिरी' बंगल्यावर दाखल झाले आहेत. त्यांच्या आमदारकीचा आज शेवटचा दिवस असतानाच, त्यांच्या जागी झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी जाहीर झाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर मिटकरी यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केल्याने, आजच्या या भेटीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.आज आमदारकीच्या शेवटच्या दिवशी अमोल मिटकरी यांनी आपल्या सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, त्याचबरोबर त्यांनी अजित पवारांसोबतचे फोटो देखील शेअर केले आहेत.

### सीबीएसई १२ वी चा निकाल जाहीर

नवीदिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने आज (१३ मे रोजी) दुपारी इयत्ता १२ वीच्या मुख्य परीक्षेचा निकाल अधिकृतपणे जाहीर केला आहे. यावर्षी एकूण ८५.२% विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी निकालात मुलांच्या तुलनेत सरस कामगिरी केली आहे. मुलींचा निकाल मुलांपेक्षा ६.७३ टक्क्यांनी अधिक लागला आहे. यावर्षी १२ वीच्या परीक्षेसाठी १८ लाख ५७ हजार ५१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी १५ लाख ७ हजार १०९ विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या निकालात तिरुवनंतपुरम विभागाने ९५.६२ टक्के निकालासह देशात अव्वल स्थान पटकावले असून, त्यापाठोपाठ चेन्नई (९३.८४%) आणि बेंगळुरू (९३.१९%) विभागांचा क्रमांक लागतो. पुणे विभागाचा निकाल ८७.३२ टक्के इतका लागला आहे. पुण विभाग यंदा विभागनिहाय निकालात दहाव्या स्थानावर राहिला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१२ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ९४.०० क्विंटल** | | |
| १,८५५ | २,७२५ | २,२९३ |
| **ज्वारी/हायब्रिड: १४४.०० क्विंटल** | | |
| १,६९९ | ४,१०० | २,३९८ |
| **मका/लोकल: २७.५० क्विंटल** | | |
| १,८३१ | १,८५० | १,८४० |
| **तूर : ५.०० क्विंटल** | | |
| ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| **उडीद : ६.५० क्विंटल** | | |
| ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| **बाजरी: ७७.०० क्विंटल** | | |
| १,८०० | २,५२१ | २,२५१ |
| **मुग: २.०० क्विंटल** | | |
| ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| **सोयाबीन: २०.०० क्विंटल** | | |
| ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| **हरभरा: ५.०० क्विंटल** | | |
| ५,१०१ | ५,१५० | ५,१२५ |

cmyk

## अग्रलेख

# पंतप्रधानांच्या हुकूमशाही वर राहुल गांधींचा पत्र प्रपंच

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या प्रमुखाची निवड निवड करण्यासाठी पंतप्रधान सरन्यायाधीश आणि विरोधी पक्ष नेता अशी समिती नेमण्यात येते मात्र निवड करताना अचानक नावे समोर ठेवली जातात त्यांचे मूल्यांकन करण्याची वेळ समिती सदस्यांना येतच नाहीत मग या निवडीचा फार्स कशासाठी विरोधी पक्ष नेत्या चा वापर फक्त रबरी स्टॅम्प म्हणून करायचा आहे का देशामध्ये केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग पिंजऱ्यातील पोपट अशी प्रतिमा तयार झाली आहे असेच राहिले तर ही प्रतिमा गडद होण्यास वेळ लागणार नाही.

यासंदर्भात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खरमरीत पत्र लिहून आपली भावना व्यक्त केली आहे पत्रामध्ये नमूद करताना त्यांनी अनेक बाबीचा उल्लेख केलेलाच आहे जनतेची विश्वासार्हता असलेल्या या केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाचा प्रमुख कोण असावा याचे स्वायत्त समितीला असावे पिंजऱ्यातील पोपट ही प्रतिमा आतापर्यंत देशभरात झाली आहे अश्याच नियुक्या झाल्या तर ती प्रतिमा सुधारण्याऐवजी त्यावर शिक्का मोर्तब होण्यास वेळ लागणार नाही

लोकशाहीमध्ये संस्थात्मक स्वायत्तता हा केवळ एक शब्द नसून तो सुशासनाचा कणा असतो. केंद्रीय अन्वेषण ब्युरो सारख्या देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेच्या प्रमुखाची निवड करताना पारदर्शकता आणि निष्पक्षता असणे अनिवार्य आहे. मात्र, विरोधी पक्षनेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्राने या निवड प्रक्रियेतील गंभीर त्रुटी आणि सरकारची कार्यपद्धती पुन्हा एकदा चव्हाट्यावर आणली आहे.

निवड समितीमध्ये पंतप्रधान, सरन्यायाधीश आणि विरोधी पक्षनेता यांचा समावेश करण्याचा मूळ उद्देशच हा होता की, या महत्त्वपूर्ण पदावर होणारी नियुक्ती कोणत्याही एका राजकीय विचारधारेच्या प्रभावाखाली असू नये. मात्र, विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या तक्रारीनुसार, त्यांना उमेदवारांचे 'स्व-मूल्यांकन अहवाल' किंवा '३६०-डिग्री अहवाल' वेळेवर दिले जात नाहीत. ६९ उमेदवारांची यादी ऐनवेळी बैठकीत समोर ठेवणे, हा निवडीचा प्रयत्न नसून ती केवळ एक औपचारिकता उरल्याचे लक्षण आहे.

सीबीआईवर राजकीय विरोधकांना लक्ष्य करण्याचे आरोप नवीन नाहीत, पण जेव्हा निवड प्रक्रियेतच 'फिक्सिंग' झाल्याचा संशय व्यक्त होतो, तेव्हा त्या संस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. विरोधी पक्षनेत्याची भूमिका केवळ 'रबर स्टॅम्प' म्हणून वापरणे, हे लोकशाहीच्या तत्त्वांना हरताळ फासण्यासारखे आहे. जर निवड समितीच्या सदस्याला उमेदवारांच्या कामगिरीचा सखोल आढावा घेण्यापासून वंचित ठेवले जात असेल, तर त्या प्रक्रियेला 'निवड' म्हणण्याऐवजी 'दिरंगाईने केलेली नियुक्ती' म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल.

सरकारने केवळ बहुमताच्या जोरावर निर्णय न घेता, विरोधी आवाजाची दखल घेणे अपेक्षित आहे. २१ ऑक्टोबर २०२५ रोजी सुचवलेल्या पारदर्शक उपायांवर अद्याप उत्तर न मिळणे, हे प्रशासकीय अहंकाराचे दर्शन घडवते. कोणत्याही लोकशाहीत संस्था टिकवण्यासाठी संवादाची आणि पारदर्शकतेची गरज असते. जर देशातील प्रमुख तपास यंत्रणाच वादाच्या भोवऱ्यात राहिली, तर सर्वसामान्यांचा न्यायव्यवस्थेवरचा आणि कायद्याच्या राज्यावरचा विश्वास डळमळीत होईल.


वेळ आली आहे की, अशा महत्त्वाच्या नियुक्त्यांमध्ये केवळ नावांची औपचारिकता न पाळता, त्यामागील लोकशाही भावना जपली जावी. अन्यथा, 'पिंजऱ्यातील पोपट' ही सीबीआयची जुनी प्रतिमा पुसण्याऐवजी ती अधिक गडद होत जाईल. केंद्रीय पातळीवर अनेक निवडी अनेक निर्णय घेतले जातात प्रामुख्याने सर्व निवडी आणि निर्णयामध्ये विरोधी पक्षाला विश्वासात घेणे गरजेचे असते मात्र येथे विश्वासात घेतले जात नाही हे सत्य आहे मात्र आता त्याला वाचा फोडण्याचे काम राहुल गांधी यांनी पंतप्रधानांना दिलेल्या पत्रांमधून केले आहे खरे पाहता पंतप्रधान आता विरोधी पक्षाच्या या नेत्याच्या पत्राची दखल घेतात का हे पाहणे गरजेचे आहे.

# ३ किलो गांजा बाळगणाऱ्या महिलेस अटक

## ● स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरामध्ये अवैध धंदयावर कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करुन कारवाई करणेबाबत मागदर्शन करुन सुचना दिल्या.**



त्यानुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, जालना पथकाला गोपनिय बातमी मिळाली की, पोलीस ठाणे कदिम जालना हद्दीत कैकाडी मोहल्ला जुना जालना परिसरामध्ये एक महिला घरामध्ये मानवी आरोग्यास अपायकारक असलेला मादक पदार्थ गांजा अवैधरित्या ताब्यात बाळगुन विक्री करित आहे. सदर ठिकाणी जाऊन बातमीतील महिलेच्या घराची पाहणी केली असता घरातील एका पोतडी मध्ये ३ किलो ८०६ ग्रॅम गांजा मिळुन आला आहे. सर्व मुद्देमाल जप्त करुन पोलीस ठाणे कदिम जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सपोनि म्हस्के, कदिम जालना हे करित आहे. सदर गुन्ह्याचा तपशील पुढील प्रमाणे गुरनं. २३०/२०२६ कलम ८(क), २०(४), गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधि. १९८५ सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे जप्त मुद्देमाल ७८,१२०.०० रुपये ३ किलो ८०६ ग्रॅम वजन असलेला अंमली पदार्थ गांजा प्लॅस्टीक आवरण, कॅरिबॅग, पोतडी, वजन काटा मापे व चिकट टेप, पॅकिंग पॉकिट असा आरोपी महिला वय ४० वर्ष रा. कैकाडी मोहल्ला मोरंडी मोहल्ला जुना जालना, आरोपी महिला रा. मोरंडी मोहल्ला जालना (फरार) सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार यांनी कारवाई केली आहे.

# डॉ.गणेश ढवळे यांच्या पाठपुराव्याला यश

## 'अतिरिक्त कामकाज'नावाखाली चालणारा 'प्रतिनियुक्त्यांचा बाजार' उठवला !

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेतील क व ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्यांनंतर ''अतिरिक्त कामकाज'' या गोंडस नावाखाली पुन्हा त्याच विभागात किंवा तालुक्यात कर्मचाऱ्यांना कार्यरत ठेवण्याच्या प्रकाराला अखेर आळा बसला असून मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांनी याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.**



जिल्हा परिषदेमध्ये मागील काही वर्षांपासून प्रशासकीय बदल्या समुपदेशनाद्वारे केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात काही मर्जीतील कर्मचाऱ्यांना ''अतिरिक्त कामकाज'' या नावाखाली पुन्हा त्याच ठिकाणी ठेवण्यात येत असल्याची गंभीर बाब समोर आली होती. त्यामुळे बदल्यांची प्रक्रिया ही केवळ दिखाऊ ठरत असल्याची भावना कर्मचारी व सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाली होती. या प्रकारामुळे प्रशासनात पारदर्शकता राहात नसून विभागप्रमुखांकडून मर्जीतील कर्मचाऱ्यांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप करत डॉ. गणेश ढवळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे हा प्रकार तात्काळ थांबवण्याची मागणी केली होती. तसेच याबाबत आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत जिल्हा परिषद बीड अंतर्गत विविध विभागांमध्ये अतिरिक्त कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला. शासन स्तरावर कोणतीही नवीन योजना किंवा पदभरती प्रक्रिया सुरू नसल्याने अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी प्राप्त अधिकारांचा वापर करून तब्बल १३ कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार कमी केला आहे. याबाबत आज दि.१३ मे रोजी आदेश काढण्यात आले असून संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी पूर्णवेळ काम करण्यासाठी कार्यमुक्त करण्यात आले आहे. तसेच तत्काळ मूळ ठिकाणी रुजू होऊन त्याचा अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देशही देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे जिल्हा परिषदेमध्ये ''अतिरिक्त कामकाज'' या नावाखाली सुरू असलेल्या प्रतिनियुक्तीच्या प्रकाराला काही अंशी तरी आळा बसणार असल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान, या निर्णयाबद्दल डॉ. गणेश ढवळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांचे आभार मानले आहेत.

# अशोक खरात प्रकरणात आता संचालक आवारेला अटक

**नाशिक । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील महिला लैंगिक प्रकरणातील आरोपी भोंदू अशोक खरात प्रकरणात एसआयटी पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. गेल्याच आठवड्याने एसआयटीने महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची चौकशी केली होती त्यानंतर आता भोंदू खरातच्या प्रकरणात सिन्नर पोलिसांनी शिवनिका संस्थानचे माजी सचिव आणि जगदंबा माता पतसंस्था संचालक नामकर्ण आवारेला अटक केली आहे.**

सिन्नर पोलिसांनी नामकर्ण आवारेला अटक केली असून आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ही अटक झाल्याची माहिती आहे. सिन्नरच्या जगदंबा माता पतसंस्थेत खरातने उघडलेल्या ३२ खात्यांना आवारे याची सहमती असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर ही कारवाई वेगाने करण्यात आली. खरातच्या कबुलीनंतर सिन्नर पोलिसांनी नामकर्ण आवारेला अटक केली. अशोक खरात ला कालच सिन्नर पोलिसांनी अटक करून आज कोर्टात हजर केले होते, अशोक खरातच्या चौकशीत नामकर्ण आवारेचे नाव पुढे आल्यानं त्यास अटक करण्यात आली. अशोक खरातला आज सिन्नर येथील न्यायालयात हजर करण्यात आले होते, न्यायालयाने १८ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# शाळेत मद्यपान आणि गंभीर गुन्हे दाखल असलेल्या शिक्षकाचे निलंबन

**बीड । प्रतिनिधी**

**शाळेत मद्यपान करून येणे, शैक्षणिक कामकाजात दुर्लक्ष करणे आणि विविध पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर गुन्हे दाखल असलेल्या एका सहशिक्षकावर जिल्हा परिषद प्रशासनाने निलंबनाची मोठी कारवाई केली आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पोथरा (ता. जि. बीड) येथील सहशिक्षक श्री. निनाळे आनंद रामकृष्ण यांना मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.**

कारवाईचे मुख्य कारण संबंधित शिक्षकावर अनेक गंभीर आरोप असून त्याचे पुरावे प्रशासनाकडे प्राप्त झाले होते: पोलीस गुन्हे: श्री. निनाळे यांच्या विरुद्ध करमाळा पोलीस स्टेशन (जि. सोलापूर) येथे १५ जून २०२३ रोजी भा.दं.सं. कलम ३२७, ३२३, ५०४, ५०६ आणि ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. नवीन गुन्हे: या व्यतिरिक्त, नेकनूर पोलीस स्टेशन (जि. बीड) येथे २६ मे २०२५ रोजी भारतीय न्याय संहिता () २०२३ च्या विविध कलमांनुसार (११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) व ३(५)) गुन्हा दाखल झाला आहे. वर्तणुकीचे उल्लंघन: शाळेत मद्यपान करून उपस्थित राहणे, विनापरवाना गैरहजर राहणे, वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करणे आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणे असे गंभीर ठपके त्यांच्यावर चौकशी अहवालात ठेवण्यात आले आहेत. निलंबनाचे आदेश महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक नियम) १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याप्रकरणी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ५ मे २०२६ रोजी ही कारवाई केली. या आदेशानुसार, त्यांना करमाळा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद झाल्याच्या दिनांकापासून म्हणजेच १५ जून २०२३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. निलंबन काळातील अटी निलंबन काळात श्री. निनाळे यांचे मुख्यालय पंचायत समिती शिरूर कासार हे राहील. तसेच, पूर्वपरवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही आणि या काळात कोणतीही खाजगी नोकरी किंवा व्यवसाय करण्यास त्यांना सक्त मनाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या या कडक निर्णयामुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली असून, गैरवर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

# जैद अहमद याचे दहावी परीक्षेत यश

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. या परिक्षेत येथील श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल चा विद्यार्थी जैद अहमद जाकेर मुल्ला याने ७०.४० टक्के गुण मिळवत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला.**



त्याच्या या यशाबद्दल श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल, बीडचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच पालक, नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडून त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# पान १ वरून...

पान १ वरून...

### केंद्र सरकारकडून खरीप

वाढ केली असली तरी इतर पिकांचे हमीभाव कमी प्रमाणात वाढवले आहेत. राज्याचे महत्वाचे पीक असलेल्या सोयाबीनचा हमीभाव ३८० रुपयांनी वाढला आहे. यंदा सोयाबीनला ५ हजार ७०८ रुपये हमीभाव असणार आहे. तर तिळाचा हमीभाव ५०० रुपयांनी वाढला आहे. तिळाला यंदा १० हजार ३४६ रुपये हमीभाव असणार आहे. भुमईमुगाचा हमीभाव २५४ रुपयांनी वाढवला आहे. कारळाच्या हमीभावात ५१५ रुपयांची वाढ केली आहे. केंद्र सरकारने लांब धाग्याच्या आणि मध्यम धाग्याच्या कापसाच्या हमीभावात ५५७ रुपयांची वाढ केली आहे. त्यामुळे लांब धाग्याच्या कापसाचा हमीभाव ८ हजार ६६७ रुपये झाला आहे. तर मध्यम धाग्याच्या कापसाला हमीभाव ८ हजार २६७ रुपये झाला आहे. कापसाचा उत्पादन खर्च आणि हेक्टरी उत्पादकता पाहता हमीभावातील वाढ अपुरी असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. हमीभाव जाहीर करताना सरकारने सर्वच पिकांसाठी उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा गृहीत धरून महीभाव जाहीर केल्याचा दावा केला आहे. पण केंद्र सरकारने पिकांचा उत्पादन खर्च अपुरा गृहीत धरला आहे. स्वामिनाथन आयोगाने उत्पादनखर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याची शिफारस केलेली होती. पण हा उत्पादनखर्च सर्वसमावेशक असावा, अशी आयोगाची अपेक्षा होती.

-----------------

### नीट पेपरफुटीची धग

लोखंडे आहे. शुभम हा 'बीएएमएस'च्या तिसऱ्या वर्षाचे शिक्षण घेत असून, करिअर कौन्सलर म्हणून तो कार्यरत होता. त्याने लाखो रुपयांच्या व्यवहारातून हा उद्योग केला असून, त्याला 'सीबीआय'च्या ताब्यात दिले जाणार आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून (एनटीए) २ मे रोजी नीट परीक्षा घेण्यात आली होती. तत्पूर्वी सोशल मीडियावर परीक्षेची प्रश्नपत्रिका व्हायरल झाल्याने राजस्थान येथील 'एसओजी' पोलिसांमार्फत तपास सुरू होता. त्यातच केंद्रीय अन्वेषण विभागाला (सीबीआय) या प्रकरणातील तपासाचे आदेश देण्यात आले. त्यानुसार मंगळवारी (दि. १२) महत्त्वपूर्ण खुलासे झाले. या प्रकरणात नाशिक शहरातील संशयित शुभम खैरनार याला ताब्यात घेतले आहे. कुरिअरद्वारे आलेली प्रश्नपत्रिका त्याने कुरिअरद्वारेच हरियाणातील गुरुग्राममध्ये पाठवली. तेथून प्रश्नपत्रिका राजस्थानपर्यंत पोहोचल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले असून 'सीबीआय' चौकशीत पुढील खुलासे होणार आहेत. गुन्हे उपायुक्त किरणकुमार चव्हाण आणि सहाय्यक आयुक्त संदीप मिटके यांनी गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाला पाचारण केले. सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत तोडकर यांचे पथक संशयिताच्या मागावर होते. त्यावेळी संशयित हा केशकर्तन करून (पूर्णतः टक्कल) देवदर्शनाच्या नावाखाली पलायन करण्याच्या तयारीत होता. पोलिसांनी दीड तासात शिताफिने त्याला ताब्यात घेतल्यावर संशयिताने गुन्ह्याची कबुली दिली.मराठवाड्यातील लातुरमध्ये काही खाजगी क्लासेसच्या चालकाची चौकशी करण्यात आली. ही चौकशी गोपनीय होती. नीट पेपरपुटीची धग संपुर्ण राज्यात असून सीबीआयने देशातुन पाच जणांना ताब्यात घेतले आहे.

----------

### बीडमध्ये पुन्हा क्षीरसागर विरुद्ध

''संघर्षाची मला सवय आहे. संघर्ष नसेल तर काम करण्यात मजा येत नाही. बीडच्या विकासाशी तडजोड होऊ देणार नाही. गरज पडल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करू. संदीप क्षीरसागर यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना आमदार विजयसिंह पंडित म्हणाले, ''मी जिल्हाधिकाऱ्यांसोबत घेतलेली बैठक ही गेवराई मतदारसंघातील विकासकामांसाठी होती. त्याचबरोबर बीड नगर परिषदेच्या काही प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. माझं बीडवर प्रेम उतू जाण्यापूर्वी बीडकरांचे माझ्यावर प्रेम उतू गेले आहे. बीडकरांनी मला कौल दिला आहे. मग त्या प्रेमाचा काहींना त्रास का होतो?या वादामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद पुन्हा उघड झाले आहेत. स्थानिक राजकारणात त्यांच्यातील संघर्ष सातत्याने चर्चेत असतो.

-----------

### विरोधी पक्षनेता रबर स्टॅम्प नाही सीबीआय

आले आहे. या पक्षपाती कार्यात सहभागी होऊन मी माझे घटनात्मक कर्तव्य टाळू शकत नाही. अस राहुल गांधी म्हणाले. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि राहुल गांधी पंतप्रधानांच्या निवासस्थान, ७, लोक कल्याण मार्ग येथे झालेल्या बैठकीला उपस्थित होते. ही बैठक सुमारे एक तास चालली. बैठकीतून बाहेर पडल्यानंतर, राहुल यांनी सोशल मीडियावर एक पत्र शेअर करून आपल्या असंतोषाची कारणे स्पष्ट केली. सध्याचे सीबीआय संचालक प्रवीण सूद यांचा कार्यकाळ २४ मे रोजी संपणार आहे.तुमच्या सरकारने सीबीआयचा वारंवार गैरवापर केला आहे. ही भारताची प्रमुख तपास यंत्रणा आहे, पण तुम्ही तिचा वापर राजकीय विरोधक, पत्रकार आणि टीकाकारांना लक्ष्य करण्यासाठी केला. संस्थांवर होणारा असा ताबा रोखण्यासाठीच विरोधी पक्षनेत्याचा निवड समितीत समावेश असतो. खेदाची गोष्ट म्हणजे, तुम्ही मला या प्रक्रियेत अशी कोणतीही भूमिका दिलेली नाही, ज्यामुळे निष्पक्ष निवड प्रक्रिया सुनिश्चित होईल. शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांचे स्व-मूल्यांकन अहवाल किंवा ३६०-डिग्री अहवाल उपलब्ध करून दिलेले नाहीत. मला हे अहवाल पाहण्यास स्पष्टपणे नकार देण्यात आला. कोणत्याही कायदेशीर आधाराशिवाय जाणीवपूर्वक माहिती देण्यास नकार देणे ही निवड प्रक्रियेची थट्टा आहे. यावरून हे स्पष्टपणे दिसून येते की केवळ तुमचा पूर्वनिश्चित उमेदवारच निवडला गेला पाहिजे. मागील दोन बैठकांमध्ये (५ मे, २०२५ आणि २१ ऑक्टोबर, २०२५), मी पंतप्रधानांना निष्पक्ष आणि पारदर्शक प्रक्रियेसाठी उपाययोजना सुचवणारे पत्र लिहिले होते. आजपर्यंत, मला त्या पत्राला कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

----------

### सोने-चांदी महागणार!

मौल्यवान धातूंच्या किमतीत मोठी उसळी पाहायला मिळणार आहे. सरकारने सोन्या-चांदीवरील प्रभावी आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. यामध्ये खालील घटकांचा समावेश आहे. मूळ सीमा शुल्क ५% वरून वाढवून १०% करण्यात आले याशिवाय कृषी पायाभूत सुविधा आणि विकास उपकर १% वरून वाढवून ५% करण्यात आला. अशा प्रकारे, एकूण आयात शुल्क आता १५ टक्के झाले आहे. विशेष म्हणजे, जुलै २०२४ च्या अर्थसंकल्पात हे शुल्क १५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले होते, जे आता पुन्हा जुन्या स्तरावर नेण्यात आले आहे.भारताला सोन्याच्या आयातीसाठी मोठ्या प्रमाणावर डॉलर्स खर्च करावे लागतात. वाढत्या आयातीमुळे परकीय चलन साठ्यावर ताण पडत असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. सोन्याची आयात कमी झाल्यास व्यापार तूट कमी होण्यास मदत होईल, ज्याचा सकारात्मक परिणाम भारतीय रुपयाच्या मूल्यावर होईल.काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला परकीय चलन वाचवण्यासाठी पुढील एक वर्ष सोने खरेदी कमी करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनानंतर लगेचच सरकारने हे ठोस पाऊल उचलले आहे.आयात शुल्क वाढल्यामुळे सराफा व्यापाऱ्यांसाठी सोने मागवणे महाग झाले आहे. परिणामी, किरकोळ बाजारात सोन्या-चांदीच्या दागिन्यांचे भाव वाढतील. सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने दागिने खरेदी करणाऱ्या कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडण्याची शक्यता आहे.

-----------

### पटेल- सुनिल तटकरे २२ आमदारांसह

एकनाथ शिंदे यांच्याही काही आमदारांचं ठरलं आहे. ज्या गोष्टी ठरल्या आहेत, त्याबद्दल मोघम बोलून चालत नाही. जे आहे ते आहे. भाजपमधून ते लढणार आहेत. फक्त प्रक्रिया फास्ट झाली. २०२९ च्या निवडणुकांपूर्वी होणं अपेक्षित होतं. कारण आताच प्रवेश झाला, तर पुन्हा निवडणूक लागेल.'' असं रोहित पवार म्हणाले. भाजपसोबत जे आहेत, त्यांच्याबरोबर आम्ही जाणार नाही, पण भाजपची साथ सोडून कोणी आमच्याकडे आलं, तर त्यांना स्वीकारु, असंही रोहित पवार म्हणाले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत लाथाळ्या थांबण्याची चिन्हे नाहीत. प्रफुल्ल पटेल यांना पदच्युत केल्याचे सोमवारी सायंकाळी उघड झाल्याने एकच खळबळ उडाली होती. त्यातच मध्यरात्री पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात कारकुनी चूक झाल्याचे स्पष्ट केले. परंतु राष्ट्रीय कार्यरकारिणीत पटेल यांना कायम ठेवले असले, तरी त्यांना पद न देणे; तसेच सुनील तटकरे यांच्याही नावासमोर राष्ट्रीय सरचिटणीस किंवा प्रदेशाध्यक्ष असे न लिहिल्याने कमालीचा गोंधळ निर्माण झाला आहे. यावरून नेत्यांमध्येही कमालीची नाराजी निर्माण झाली आहे.

-------------

### कॅनरा बँक घोटाळा प्रकरणी ५

करण्यात आली आहे.बँकेच्या धोरणानुसार सुरु असलेल्या सुवर्ण कर्ज पाकिटांच्या त्रैमासिक पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान हा घोटाळा उघड झाला. २२ एप्रिल २०२६ रोजी तपासणी सुरु असताना काही पाकिटे बनावट असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर केलेल्या सखोल चौकशीत आणि सीसीटीव्ही फुटेजच्या तपासणीत धक्कादायक बाबी समोर आल्या. सोन्याची चोरी व बनावट दागिने : तपासात एकूण २२ सुवर्ण कर्ज पाकिटांमध्ये बनावट सोने आढळले, ज्यांची किंमत ३.७९ कोटी रुपये आहे. तसेच, स्ट्राँग रुममधून ३० सोन्याची पाकिटे (किंमत ३.५२ कोटी रुपये) गायब असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, या प्रकरणातील फरार आरोपी संजय आसाराम डोंगरे (वय ३०, धंदा बँक अधिकारी कॅनरा बँक सध्या निलंबीत रा. रिसोड जि. वाशीम) याच्यासह सचिन रामप्रसाद सानप (वय २७रा. पिंपळणेर ता. लोणार जि. बुलढाणा), सार्थक नारायण जाधव (वय २३ रा. वाकद ता. रिसोड जि. वाशीम), रघुनाथ खंडुजी शिंदे (वय ३३ रा. भराडखेडा ता. बदनापूर) आणि शिवाजी भाउराव दराडे (वय ३६ रा. भराडखेडा ता. बदनापुर) या पाच आरोपींना अटक करुन न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे तसेच दुसरी घटना अंबड कॅनरा बँकेच्या खात्यामधून २३ लाख रूपये परस्पर वर्ग करण्यात आले होते बँकेतून परस्पर २३ लाख १३ हजार ५९ रूपये योगेश प्रभाकर काळबांडे यांच्या खात्यावर परस्पर वर्ग केल्याच्या आरोपावरून कॅशियर सुजीतकुमार यांच्याविरूध्द अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता

------------

### निदा खानला आश्रय देणाऱ्या

नोटिशीला समाधानकारक उत्तर न मिळाल्याने आणि न्यायालयानेही दिलासा नाकारल्याने आज पहाटे ६:१५ वाजता तीन जेसीबीच्या साहाय्याने हे अवैध बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले.महानगरपालिका कारवाई करणार असल्याची माहिती मिळताच, चे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्यासह पक्षाचे ३४ नगरसेवक आणि हजारो कार्यकर्ते मध्यरात्री साडेबारा वाजता नारेगावमध्ये जमा झाले होते. ''ही कारवाई राजकीय सूडबुद्धीने केली जात आहे,'' असा आरोप करत कार्यकर्त्यांनी प्रशासनाला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, पहाटेच्या सुमारास पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात करत ही कारवाई पूर्ण केली.नाशिकमधील च्या युनिटमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचे जबरन धर्मांतर करणे, त्यांना हिजाब घालण्यासाठी प्रवृत्त करणे आणि हिंदू देवी-देवतांचा अपमान केल्याचा आरोप निदा खानवर आहे. निदा खान सुमारे २५ दिवस फरार होती. तांत्रिक तपासाद्वारे पोलिसांनी तिला मतीन पटेल यांच्याशी संबंधित घरातून ताब्यात घेतले. आरोपीला कायदेशीर कारवाईपासून वाचवण्यासाठी आश्रय दिल्याप्रकरणी मतीन पटेल यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम २४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

----------------

### सुप्रीम कोर्ट ; घरात एक दिवा लावला तरी पुरेसा

असे ठरवण्यात आले. त्यांनी मला कधी विचारले नाही. आमच्यापैकी कोणीही असे कधी म्हटले नाही,' असे मोहन गोपाळ यांनी युक्तिवाद करताना म्हटल्याचे पीटीआयने वृत्त दिले आहे. ''मला देखील वेदांप्रती आदर आहे. पण, आज हिंदू धर्मातील प्रत्येक व्यक्ती वेदांना आणि तत्त्वज्ञानाच्या सर्व बाबींमध्ये वेदांना सर्वोच्च प्रमाण मानतो का?, असा सवाल गोपाळ यांनी उपस्थित केला.

----------

### पंतप्रधानांच्या ताफ्यातील

आहे. हैदराबादमध्ये दिलेल्या भाषणानंतर, गुजरात आणि आसामच्या दौ-यांदरम्यानही त्यांच्या ताफ्याचा आकार याच पद्धतीने कमी करण्यात आला होता. पंतप्रधानांनी अशीही सूचना दिली आहे की, जिथे जिथे शक्य असेल तिथे त्यांच्या ताफ्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश करण्यात यावा; मात्र यासाठी केवळ याच उद्देशाने कोणतीही नवीन वाहने खरेदी केली जाऊ नयेत, अशी अट त्यांनी घातली आहे.

-----------

## थोडक्यात

### जागतिक परिचारिका दिनानिमित्त स्वागत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयात जागतिक परिचारिका दिनानिमित्त सर्व परिचारिकांना शुभेच्छा देण्यात आल्या.याप्रसंगी अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे,डॉ.राकेश जाधव,महादेव आदमाने ,बळीराम चोपणे अनंत आरसुडे, मंदार काटे,बालासाहेब शेरेकर,योगेश कडबाने संजय गंभीरे, सत्यप्रेम इंगळे आदी उपस्थित होते. यावेळी रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून दिवस-रात्र निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या सर्व परिचारिका भगिनींच्या समर्पित सेवेचा गौरव करण्यात आला. समाजाच्या आरोग्य व्यवस्थेचा भक्कम आधारस्तंभ असलेल्या परिचारिका मायेच्या स्पर्शाने, संयमाने आणि सेवाभावी वृत्तीने असंख्य रुग्णांना नवजीवन देण्याचे महान कार्य करत आहेत. संकटाच्या काळात स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार न करता रुग्णांच्या सेवेसाठी अहोरात्र झटणाऱ्या सर्व परिचारिका भगिनींचे योगदान अतुलनीय आणि प्रेरणादायी आहे. परिचारिकांनी अत्यंत धैर्याने आणि निस्वार्थपणे सेवा बजावत लाखो नागरिकांना दिलासा देण्याचे कार्य केले. त्यामुळे समाजात परिचारिका या केवळ आरोग्यसेविका नसून मानवतेचे जिवंत प्रतीक म्हणून ओळखल्या जातात परिचारिका भगिनींचा गौरव करून शुभेच्छा देण्यात आल्या.

### राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेची बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत प्राप्त प्रकरणांच्या अनुषंगाने आढावा बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान , पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच शिक्षणाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

बैठकीमध्ये जिल्ह्यातील विविध शाळांमधून प्राप्त विद्यार्थी अपघात प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी एकूण ५ प्रस्ताव समितीपुढे शिफारशीसाठी ठेवण्यात आले होते.त्यापैकी ०३ विद्यार्थी अपघाताने मृत्यू व ०२ विद्यार्थी अपघाताने जखमी झालेले होते. सदर प्रस्तावांची छाननी करून समितीमार्फत त्यांना मंजुरी देण्यात आली. पात्र विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना शासन नियमानुसार सानुग्रह अनुदान तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करावी, अशा सूचना मा. जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत शाळास्तरावर जनजागृती करण्यावर भर देण्यात यावा, असेही निर्देश देण्यात आले.अपघात घडल्यानंतर संबंधित शाळांनी एका महिन्याच्या आत विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करावेत. विहित कालावधीत प्रस्ताव सादर न केल्यास संबंधित शाळांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

### जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीसाठी उपलब्ध

बीड : जिल्हा माहिती कार्यालय, बीड येथील वर्तमान पत्रांची रद्दी आहे त्या स्थितीत व स्वरूपात रद्दीची विक्री करावयाची आहे. ज्यांना रद्दी घ्यावयाची आहे. त्यांना कार्यालयीन वेळेत रद्दी पाहवयास मिळेल. तसेच रद्दी खरेदी करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी त्यांच्या लिफाफाबंद निविदा दरपत्रक प्रति किलोप्रमाणे जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालयाच्या बाजुला, नगर रोड, बीड या पत्यावर दि. १८ मे २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

रद्दी प्रत्यक्ष पाहून बंद लिफाफ्यात आपले आवश्यकतेनुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. रद्दी विक्रीचे दरपत्रक मंजूर करणे अथवा रद्द करणे, रद्दी विक्रीबाबतचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बीड यांचे असतील. १८ मे २०२६ तारखेनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

# पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे धाव

## आशिष धिवार मृत्यूप्रकरण दाबण्याचा प्रयत्न करू नका; कुटुंबीयांचा संताप

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील काळेगाव (घाट) येथील युवक आशिष ऊर्फ बंटी आशोक धिवार यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी वातावरण चांगलेच तापले असून, मृताच्या कुटुंबीयांनी थेट पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे धाव घेत न्यायाची मागणी केली आहे. पोलिस कर्मचारी, कारागृह प्रशासन तसेच जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर अमानुष वागणूक, मारहाण आणि निष्काळजीपणाचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

मृत आशिषचा भाऊ अभिषेक धिवार यांनी दिलेल्या निवेदनात धक्कादायक आरोप करत म्हटले आहे की, दि. २३ एप्रिल रोजी केज पोलिसांनी आशिषला अटक करताना घरातून फरफटत बाहेर काढले व कुटुंबीयांसमोर बेदम मारहाण केली. पोलिसी खाक्या दाखवतो अशी धमकी देत मानसिक व शारीरिक छळ




करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याचबरोबर तपासी अधिकाऱ्यांनी एक लाख रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. पैसे न दिल्यास हाल करू अशी धमकी देण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

न्यायालयीन कोठडीनंतर आशिषची प्रकृती अचानक बिघडली. त्याला बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथेही योग्य उपचार न मिळाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. डॉक्टर व पोलिस गार्डकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. अखेर दि. २८ एप्रिल रोजी उपचारादरम्यान आशिषचा मृत्यू झाला. या संपूर्ण प्रकरणात संबंधित पोलिस कर्मचारी, कारागृह अधिकारी, डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर किंवा जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे सहकुटुंब अमरण उपोषण छेडण्यात येईल, असा आक्रमक इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे केज तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

# परळीत १८ मे रोजी दहावी-बारावी पास गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

परळी । प्रतिनिधी

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत विशेष प्राविण्यासह पास झालेल्या परळी शहरातील सर्व गुणवंत विद्यार्थांच्या दिनांक १८ मे २०२६ रोजी परळी येथील लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिरात, सांय.५:३० वा सत्काराचे व करिअर गाईडन्स कार्यकमाचे आयोजन परळी भिमजयंती महोत्सव समिती व नालंदा फाऊन्डेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

दहावी व बारावी नंतर कोणत्या करिअर ऑपशन निवडाव्या, यासंदर्भात विद्यार्थी व पालक गोंधळलेले असतात किंवा अनभिज्ञ असतात, त्यामुळे या सत्कार कार्यक्रमात विद्यार्थांना करीअर गाईडन्स सुद्धा करण्यासाठी तज्ञ मंडळीना पाचारण करण्यात येणार आहे. दहावीत ज्यांना कमीत कमी ७५% गुण व बारावीत कमीत कमी (कोणत्याही शाखेत) ६५% गुण प्राप्त असतील त्यांनी खाली दिलेला मो नं. वर अथवा त्या ठिकाणी संपर्क करावा व गुणपत्रिकेची झेरॉक्स जमा करावी.

गुणवत्ता प्राप्त विद्यार्थांना प्रमाणपत्र, ट्राफी व वस्तू स्वरुपात भेट देण्यात येणार आहे तसेच या सत्कार कार्यक्रमांस शिक्षण क्षेत्रातील नामांकित प्रमुख मार्गदर्शक व करिअर गाईड उपस्थित राहून विद्यार्थांना व पालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

तरी विद्यार्थ्यांनी मिलिंद विद्यालय तथा मिलिंद ज्यू कॉलेज परळी येथे रोज सकाळी १० ते ११:३० यावेळेत प्रा विलास रोडे (९४२३७१४४६४), नितीन व्हावळे सर, प्रा दासू वाघमारे ( पंच शिलनगर) ८७८८०२७२२९, बाबासाहेब पाचांगे साहेब, (माधवबाग) ९५९५७७९७८० यांना संपर्क करून नाव नोंदणी करावी, किंवा फोनकरून नोंदणी करावी. ऐनवेळी नावे स्विकारली जाणार नाहीत. तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी या सत्कार सोहळ्यास उपस्थित रहावून कार्यक्रम यशस्वी करावा व आपल्या यशाची गुरुकिली येथे सापडण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन संयोजक मंडळाने केले आहे.

## पान ६ वरुन...

### बीडच्या शिक्षणाधिकाऱ्याकडून

असल्यामुळे शेळके यांना जॉईन करून घेता येणार नाही असे निदर्शनास आणून दिले होते. असे असताना देखील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिनांक १७/०८/२०२५ रोजी सुधाकर मधुकर शेळके यांना तत्काळ रजू करून घ्यावे असे आदेश संस्थेस दिले. मा. उच्च न्यायालयाने शाळा न्यायधीकरणाच्या आदेशास स्थगिती दिली असताना देखील व त्याचे ज्ञान प्रियाराणी पाटील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांना असतांना देखील हेतू परस्पर मा. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करण्याच्या उद्देशाने कर्मचाऱ्यास रजू करून घेण्याचे आदेश काढले व न्यायालयाचा अवमान केला. म्हणून संस्थेचे सचिव भारती विशाल पाटील व हेडमास्तर विशाल पाटील यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये अवमान याचिका क्रमांक २८१/२०२६ दाखल केली व सदरील याचिकेची सुनावणी दिनांक ०४/०५/२०२६ रोजी मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण आर. पेडणेकर यांच्या पुढे झाली असता न्यायालयाने प्रतिवादी प्रियाराणी पाटील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड व सुधाकर मधुकर शेळके यांना नोटीस काढून याचिकेची पुढील सुनावणी दिनांक १५/०६/२०२६ रोजी ठेवली आहे. याचीका कर्त्याच्या वतीने ॲड. नरसिंह एल.जाधव यांनी काम पाहिले.

### उष्माघातापासून सावध राहा

तयार ठेवण्यात आला आहे . जिल्हा नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्यात आला असून नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ संपर्क साधावा , असे आवाहन त्यांनी केले. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , गावपातळीवर मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे . ग्रामसेवक , तलाठी , आशा कार्यकर्त्या , शिक्षक आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून नागरिकांना उष्माघाताची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय समजावून सांगितले जात आहेत . विशेषतः वृद्ध नागरिक , लहान मुले , गर्भवती महिला आणि मैदानी कामगारांनी अधिक काळजी घ्यावी , असे त्यांनी स्पष्ट केले. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते , शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होणे , जास्त घाम येणे , अशक्तपणा , डोके गरगरणे , उलट्या , उच्च तापमान , त्वचा कोरडी पडणे आणि शुद्ध हरपणे ही उष्माघाताची प्रमुख लक्षणे आहेत . अशा परिस्थितीत रुग्णाला सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवून त्वरित पाणी द्यावे आणि जवळच्या रुग्णालयात दाखल करावे . जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये आवश्यक खाटा , औषधसाठा आणि कोल्ड बेडची व्यवस्था करण्यात आली आहे .

जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार , बीड जिल्ह्यात ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात उपचारासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे . प्रत्येक केंद्रात स्वतंत्र शीत कक्ष तयार करण्यात आले असून डॉक्टर , नर्स आणि आरोग्य कर्मचारी यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे . ग्रामस्तरावर ६२० ग्रामसेवक , ५१२ तलाठी आणि ५१७ आरोग्य कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून जनजागृती सुरू आहे .

प्रशासनाने नागरिकांना भरपूर पाणी पिणे , जठड किंवा लिंबूपाणी घेणे , हलके सुती कपडे वापरणे , डोक्यावर टोपी किंवा कापड ठेवणे , उन्हात वाहनात लहान मुले किंवा वृद्धांना एकटे न सोडणे तसेच दारू आणि अतिउष्ण पेये टाळण्याचा सल्ला दिला आहे . शेतकरी , बांधकाम मजूर आणि रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांनी सकाळी किंवा सायंकाळी काम करण्यावर भर द्यावा , असेही प्रशासनाने नमूद केले आहे. दरम्यान , जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली विविध शासकीय विभागांनी उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई , आरोग्य सेवा , जनजागृती आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या असून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### उर्दुघरला मिळाली

यांचा शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू होता. या संदर्भात काही दिवसांपुर्वीच आ. क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेतली होती. तसेच, शासनाकडे याबाबत सातत्याने पत्रव्यवहार आणि पाठपुरावा केला होता. त्यावर शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाकडून बीड शहरात उर्दुघर उभारणीसाठी अधिकृत मंजुरी मिळाली असून, पुढिल प्रशासकीय प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. या वास्तूमुळे बीड शहरात, उर्दु भाषा, साहित्य आणि सांस्कृतीच्या जतनासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या झालेल्या सकारात्मक आणि ऐतिहासिक निर्णयामुळे आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघाच्या वतीने, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या बद्दल कृतज्ञता व आभार व्यक्त केले आहेत. सोबतच आ.क्षीरसागरांच्या पाठपुराव्याने मिळालेल्या या यशामुळे हा मास्टरस्ट्रोक ठरला असून, मुस्लिम समाजात आ.क्षीरसागर यांच्यासाठी सकारात्मक लहर तयार झाल्याचे दिसून येत आहे.

### दिवंगत माजी नगराध्यक्ष जाबेर

स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब, स्व. पंडित अण्णा मुंडे यांचे जुने सहकारी, परळी पंचायत समितीचे माजी उपसभापती तसेच टोकवाडी गावचे माजी सरपंच माधवराव मुंडे यांच्या पत्नी कै. द्वारकाबाई मुंडे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले होते. धनंजय मुंडे यांनी टोकवाडी येथील त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन मुंडे कुटुंबीयांचेही सांत्वन केले. यावेळी अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, माजी पंचायत समिती सभापती पिंटू मुंडे, गणेश मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

# अंबाजोगाई पिपल्स बँकेस सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम पुरस्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.अंबाजोगाई या बँकेला क्रेस्ट इन्फो मिडिया यांच्या वतीने पुणे येथे आयोजित ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकींग सम्मीट ऍण्ड अवॉर्ड - २०२६ सोहळ्यात सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले.बँकेने केंद्र सरकार, आरबीआय, सहकार खाते आणि बँकींगचे सर्व नियम पाळून बँकींग सेवा तसेच विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या.

सलग दुसऱ्या वर्षी अंबाजोगाई पिपल्स बँकेला क्रेस्ट इन्फो मिडिया यांच्या वतीने पुणे येथे आयोजित ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकींग सम्मीट ऍण्ड अवॉर्ड - २०२६ या सोहळ्यात सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम पुरस्कार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, सरव्यवस्थापक गणेश अष्टपुत्रे संदेश बोराडे, गणेश रोकडे यांनी स्विकारला.

बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, पिपल्स बँक २१ कार्यरत शाखा व २ विस्तारित कक्ष अशा एकूण २३ शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना तत्पर व दर्जेदार बँकिंग सेवा देत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या केज, मुरूड व निलंगा या ठिकाणी बँकेच्या नवीन शाखा कार्यरत झाल्या आहेत. बँकेला प्राप्त पुरस्काराबद्दल

बँकेचे व्हाईस चेअरमन प्रकाश सोळंकी, संचालक




वसंत चव्हाण, ऍड.विष्णुपंत सोळंके, पुरूषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, ऍड.सुधाकर कराड, संकेत मोदी,शेख दगडू शेख दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे, श्रीमती वनमाला रेड्डी,स्नेहा हिवरेकर, तज्ज्ञ संचालक सुनिल राजपुरोहित, तज्ज्ञ संचालक सचिन बेंबडे, मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे,सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक, बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारी यांच्यासह सर्वांचे अभिनंदन होत आहे.

# वसंतराव नाईक विद्यालयाचा विद्यार्थी आरुष मगर याची नवोदय विद्यालयासाठी निवड



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील नामांकित असलेल्या वसंतराव नाईक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा येथील इयत्ता पाचवी वर्गातील विद्यार्थी आरुष राहुल मगर याची नवोदय विद्यालय गढी येथे निवड झाली आहे .

केंद्रीय नवोदय विद्यालय गढी मार्फत बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी परीक्षा झाली होती या परीक्षेसाठी शहरी व ग्रामीण असे दोन भाग प्रवेशासाठी असतात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी आरुष राहुल मगर नवोदय विद्यालय प्रवेश गुणवत्तायादी मध्ये समाविष्ट होता आरुष मगर याचा प्रवेश निश्चित झाल्याचे पत्र नवोदय विद्यालय गडी येथून विद्यालयास प्राप्त झाले असून त्याचे निवड पुढील शिक्षणासाठी गढी येथे झाले असल्याचे कळविण्यात आले आहे. आरुष राहुल मगर याची नवोदय विद्यालय गढी येथे निवड झाली असल्याने विद्यालयाची गुणवत्ता सिद्ध झाली आहे आरुष मगर यांच्या निवडीबद्दल नवनिर्माण शिक्षण संस्थेचे संस्थापक रामकृष्णजी बांगर मार्गदर्शिका सौ सत्यभामा ताई बांगर मंडळाचे अध्यक्ष विजयसिंह बाळा बांगर विद्यालयाचे प्राचार्य तुकाराम तुपे पर्यवेक्षक संजय राख व सर्व शिक्षक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धुनकवाड येथे सरपंच भागवत गव्हाणे यांच्या पुढाकारातून पिण्याच्या पाण्याची सोय

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड नं. १ व २ येथे उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून तातडीने उपाययोजना करण्यात आली आहे. गावातील बंद पडलेल्या हातपंपांमध्ये मोटार बसवून तसेच पाणीसाठ्यासाठी टाक्यांची व्यवस्था करून ग्रामस्थांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

धुनकवाडचे कार्यतत्पर सरपंच भागवत गव्हाणे यांच्या



पुढाकारातून हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. गावातील अनेक हातपंप तांत्रिक बिघाडामुळे बंद अवस्थेत होते. त्यामुळे नागरिकांना विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी मोठी समस्या निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने बंद हातपंपांची दुरुस्ती करून त्यामध्ये मोटार बसविण्याचा निर्णय घेतला. यासोबतच पाण्याचा साठा उपलब्ध राहावा यासाठी पाण्याच्या टाक्यांचीही व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे ग्रामस्थांना नियमित व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होत आहे. कमी वेळेत प्रभावी नियोजन करून ही सुविधा सुरू करण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. या पाणीपुरवठा सुविधेचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गावातील नागरिकांनी सरपंच भागवत गव्हाणे यांच्या कार्याचे कौतुक करत ग्रामपंचायतीने गावकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देऊन तत्परतेने काम करावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या गंभीर बनत असताना धुनकवाड ग्रामपंचायतीने केलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना मोठा आधार मिळाला आहे.

## पान ६ वरुन...

### उन्हाचा तडाखा वाढला, पण

ओळख अधिक ठळक होत आहे. ''जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणे हीच खरी लोकप्रतिनिधीची जबाबदारी आहे,'' या भूमिकेतून ते प्रत्येक निमंत्रणाचा सन्मान करण्याचा प्रयत्न करतात. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत मतदारसंघात सुरू असलेला त्यांचा दौरा आणि प्रत्येकाशी आत्मीयतेने संवाद साधण्याची शैली यामुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वाढत्या तापमानातही न थांबणारा जनसंपर्क

मे महिन्यातील कडाक्याच्या उन्हात अनेक जण घराबाहेर पडणे टाळत असताना धस कुटुंब मात्र जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी सातत्याने धावपळ करत आहे. यामुळे ''उन्हाचा पारा वाढला, पण जनसंपर्काचा उत्साह कमी झाला नाही,'' अशी प्रतिक्रिया मतदारसंघातील नागरिक व्यक्त करत आहेत.

आगामी राजकारणासाठी बळकट होत असलेली पकड

राजकीय विश्लेषकांच्या मते, मतदारसंघातील प्रत्येक कुटुंबाशी वैयक्तिक संपर्क ठेवण्याची धस कुटुंबाची ही शैली आगामी काळात अधिक प्रभावी ठरू शकते. केवळ विकासकामेच नव्हे तर सामाजिक आणि कौटुंबिक प्रसंगातही सहभागी होऊन जनतेचा विश्वास संपादन करण्याची त्यांची पद्धत मतदारसंघात मजबूत राजकीय समीकरण निर्माण करत असल्याचे बोलले जात आहे.

प्रत्येक कार्यक्रमात साधेपणाने उपस्थित राहून नागरिकांच्या आनंदात सहभागी होणारे आ. सुरेश धस आणि धस कुटुंब यांची ''आपलं माणूस'' अशी प्रतिमा अधिक दृढ होत आहे. त्यामुळे मतदारसंघात विकास, जनसंपर्क आणि आत्मीयतेचा त्रिवेणी संगम घडविणारे नेतृत्व म्हणून धस कुटुंबाकडे पाहिले जात आहे.



राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि.१४ मे २०२६






# शेती आपली आई, तिला रासायनिक खतापासून वाचवावं लागेल

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचं शेतकऱ्यांना आवाहन

खाद्यतेलावर मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होत आहे. त्यामुळं त्याचा कमी वापर करावा. खाद्यतेलाचा वापर कमी केल्यास देशाला आणि स्वत:ला फायदा होईल. तसेच शक्य तिथे ऑनलाईन मिटिंग घ्याव्यात, शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गेल्या २४ तासात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुसऱ्यांदा हे आवाहन केलं आहे. आपण शेतकऱ्यांची मुलं आहोत. आपल्याला रासायनिक खतांपासून शेतीला वाचवावं लागेल. त्यामुळं शेतकऱ्यांना आता रासायनिक खतांपासून मुक्ती मिळवण्याचा मार्ग अवलंबने गरजेचं असल्याचं पंतप्रधान म्हणाले. नैसर्गिक शेतीकडे वाटचाल करावी असेही ते म्हणाले.

जग विविध संकटांचा सामना करत आहे पहिल्यांचा कोरोनाचे संकट, त्यानंतर आर्थिक संकट आणि आता पश्चिम आशियात वाढत जाणारा तणाव. याचा परिणाम संपूर्ण जगावर पडत आहे. भारतावरही याचा परिणाम होत असल्याचे पंतप्रधान





नरेंद्र मोदी म्हणाले. कोरोना संकट हे सगळ्यात मोठं संकट होते. आता पश्चिम आशियात सुरु असणारे युद्ध हे देखील या दशकातील मोठे संकट आहे. या संकटातून आपणही पुढे जाऊ असे पंतप्रधान म्हणाले.


या विरपरीत पस्थितीत आपणा सर्वांचं योगदान महत्वाचं असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. आपल्याला कर्तव्याला प्रथामिकता द्यावी लागेल.

देश संकटातून जात आहे असे पंतप्रधान म्हणाले. आपण सर्वांनी मिळून देशावर पडणारा बोजा कमी करु असेही मोदी म्हणाले. भारत करोडो रुपयांची विदेशी मुद्रा खर्च करत आहे. किंमती मोठ्या प्रमाणात वाढत आहे, पुरवठा साखळी विस्कळीत झाली असल्याचे पंतप्रधान यावेळी म्हणाले. सर्वांनी छोटो छोटे योगदान देणं गरजेचे आहे.

ज्या क्षेत्रातून कच्च तेल मिळत आह, तिथेच युद्ध सुरु आहे. त्यामुळं परिस्थिती सामान्य होत नाही तोपर्यंत छोटे संकल्प करावे लागतील असे पंतप्रधान म्हणाले.

जिथे गरज आहे तिथे पेट्रोल डिझेलचा उपयोग कमी करा, मेट्रोचा वापर करा, इलेक्ट्रीक बस वापरा, पब्लिक ट्रानस्पपोर्टचा वापर करा असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. वर्क फ्रॉम होमला प्राथमिकता द्या, ऑनलाईन काम करा. इंधनही खाण्याचे तेलावरही मोठ्या प्रमाणात परकीय चलन खऱ्च होते. कमी वापर केल्यास देशाला आणि स्वतला फायदा होईल.

# बरसीम लागवड करा मिळवा आर्थिक फायदे



सध्याच्या घडीला डेअरी व्यवसाय ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी मोठा व्यवसाय म्हणून समोर आला आहे. पशुपालन करणारे शेतकरी बहुतांशी जातिवंत दुधाळ गायी आणि म्हशी पाळण्यास प्राधान्य देतात. डेअरी व्यवसायातून शेतकऱ्यांना बऱ्यापैकी आर्थिक फायदा देखील होत आहे. मात्र, बऱ्याचदा जनावरांच्या खानपानावर विशेष लक्ष न दिल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागते. त्यामुळे डेअरी व्यवसाय सुरू करण्याआधी जनावरांची देखभाल आणि आहाराबाबत शेतकऱ्यांना अधिक माहिती असणे आवश्यक असते. दुधाळ जनावरांना बरसीम गवत हे अतिशय लाभदायक आहे.

बरसीम हे गवत शेतकरी आणि पशुपालकांसाठी खूप महत्वाचे आहे. जनावरांच्या आहारात त्याचा समावेश केल्यास, दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होते. बरसीम गवत हे मेथीच्या भाजीप्रमाणे असलेले एक चारा पीक आहे. बरसीम नैसर्गिकरित्या उगवत नाही. परंतु जनावरांच्या चाऱ्यासाठी त्याची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. कडधान्य पीक म्हणूनही त्याची ओळख आहे. रब्बी हंगामात पाण्याची पुरेशी सोय असलेल्या भागात बरसीमची लागवड केली जाते. सुमारे दीड ते दोन महिन्यांनंतर बरसीमचे गवत कापणीला येते. हे गवत वेगाने वाढणारे गवत असून, ते ३५ दिवसांच्या अंतराने पाच ते सहा वेळा कापले जाऊ शकते. विशेष म्हणजे बरसीम पेरल्याने शेताची सुपीकताही वाढते.कसे देतात जनावरांना बरसीम गवत :

उन्हाळाच्या दिवसांमध्ये दुधाळ जनावरांची दूध उत्पादन क्षमता कमी होते. अशा परिस्थितीत जनावरांचे दूध उत्पादन वाढविण्यासाठी पुरेसा हिरवा चारा व धान्याच्या कणेची व्यवस्था करणे आवश्यक असते. बरसीम गवत जनावरांचे दूध वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. ते कापून पेंढा मिसळल्याने फायदा होतो. प्रत्येक तीन किलो पेंढ्यामध्ये दीड किलो बरसीम गवत मिसळून दुधाळ जनावरांना खायला देणे चांगले असते. पौष्टिक गुणधर्मांनी समृद्ध असण्यासोबतच ते पचायलाही सोपे असते. दुधाळ जनावरांना दररोज बरसीम खायला दिल्याने त्यांचे दूध वाढते आणि त्यांचे आरोग्यही चांगले राहते.

आर्थिक स्थिती सुधारण्यास होते मदत : जर तुमच्याकडे पाण्याची सोय असेल तर लहान जागेतही तुम्ही बरसीम गवत लागवड करू शकतात. हे गवत वेगाने वाढण्यासोबतच जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी मदत करते. ग्रामीण भागात अनेक शेतकरी मोठ्या प्रमाणावर बरसीमची लागवड करतात. याशिवाय शहरांमध्येही राहणाऱ्या दुग्ध उत्पादकांना या गवताची विक्री केली जाते. बरसीम गवतामुळे जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्याबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीही सुधारण्यास मदत करतो.

# गहू बियाणे साठवण दरम्यान कीड आणि रोग व्यवस्थापन

सध्या गहू उत्पादनामध्ये आपण स्वयंपूर्ण बनलो आहोत व राखीव साठेसुद्धा ओसंडून वाहत आहेत. बियाणे जर चांगल्या प्रतीचे असेल तर उत्पादनही भरघोस मिळते. बियाणे साठवण करून ठेवणे, त्याची कीड व रोगापासून काळजी घेणे गरजेचे आहे. बियाणे साठवणुकी मध्ये आढळणारे प्रमुख कीड व रोगाचे व्यवस्थापन कसे करावे व साठवणूक करण्याच्या पध्दती विषयी माहिती या लेखात सादर केली आहे. साठवणकाळात धान्याचे १०% नुकसान होते, तेव्हा ते होऊ नये म्हणून धान्य सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. बियाणांना कीड व रोगांचा प्रादुर्भाव पावसाळ्यात जास्त प्रमाणात दिसून येतो. त्यासाठी बियाणे सुरक्षित व चांगल्या उगवणक्षमतेचे ठेवण्यासाठी योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे.

लहान बिन किवां आयताकृती बिन:

या प्रकारची रचना सर्वत्र आढळते. हे प्रामुख्याने धान्य जास्त काळ साठवून ठेवण्यासाठी वापरले जाते. मुख्यत: बाजरी, गहू, डाळींचे विविध प्रकार इत्यादी धान्य साठवण्यासाठी यांचा वापर केला जातो. यांची क्षमता ७० ते ८० किलो पर्यंत असते. अशा प्रकारच्या कोठ्यांमध्ये किडींचा व बुरशीचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात होतो. त्यामुळे खर्चात बचत होते. बियाणे व बाहेरील हवामान यांचा संपर्क कमी येतो. बियाणे ठेवण्यास आणि काढण्यास अत्यंत सोपे जाते. हे सामान्यत: भिन्न क्षमतेत येते.

मोठे बिन: या प्रकारची बिन लहान बिनाप्रमाणेच असून जास्त क्षमतेचे असतात. हे प्रामुख्याने धान्य जास्त काळ साठवून ठेवण्यासाठी वापरले जाते. यांची क्षमता २० ते ३० क्विंटल पर्यंत असते. अशा प्रकारच्या कोठ्यांमध्ये किडींचा व बुरशीचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात होतो. बियाणे ठेवण्यास आणि काढण्यास अत्यंत सोपे जाते.

कच्च्या मातीने तयार केलेली कोठी किंवा मातीची वाडगी: महाराष्ट्रातील ग्रामीण व आदिवासी भागामध्ये मुख्यत: अशा





प्रकारचे कोठी बियाणे साठवणुकीसाठी वापरली जातात. मुख्यतः मका, गहू, भात आणि बाजरी साठवण्याकरिता याचा उपयोग केला जात असे व त्याची क्षमता १५ ते २० किलो पर्यंत होती. या प्रकारात पावसाळ्यात मातीची वाडगी ओलावा धरून ठेवतात. त्यामुळे किडींचा व बुरशीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसून येतो.

बांबूची किंवा गवतापासून बनवलेली कोठी: स्थानिक गवतवर्गीय उंच बारीक-पातळ बनस्पतींपासून तयार केलेले धान्य साठवण कंटेनर आणि किटकांपासून बचाव करणाऱ्या कोरड्या सागाच्या पानांनी प्लास्टर केलेल्या कंटेनर चा वापर आदिवासी भागांमध्ये जास्त करून दिसून येतो. सागाच्या वाळलेल्या पानांचा वापर साठवलेल्या धान्याच्या संरक्षणासाठी केला जातो कारण त्यांच्या वासाने कीटक दूर होतात.

तागाची पोती किवां प्लास्टिक पिशव्या: तागाची पोती किंवा गोणी बियाणे साठवण्यासाठी महाराष्ट्रात सर्वत्र वापरली जातात. अशा प्रकारच्या संरचनेत काही निश्चित प्रमाणात धान्य प्लास्टिकच्या पिशव्यामध्ये साठवून ठेवतात आणि पिशव्या एकमेकांवर ठेवतात. या प्रकारचा संग्रह मुख्यतः खोलीच्या कोपऱ्यात, हॉल आणि मोठ्या गोडाऊनमध्ये होतो. बॅगची क्षमता साधारणत: ५ ते ५० किलो असते. या प्रकारामध्ये किडींचा प्रादुर्भाव साधारणतः पावसाळ्यात दिसून येतो.

प्लास्टिक धाग्यापासून तयार केलेली पोती: सध्या अशा प्रकारच्या पिशव्या बाजारामध्ये सहज उपलब्ध होतात, परंतु यामध्ये बियाणे जास्त काळासाठी साठवून ठेवता येत नाही. अशा प्रकारच्या पिशव्यांमध्ये किडींचा व उंदरांचा प्रादुर्भाव जास्त होतो. दगडाने बनवलेली कोठी: धान्य कमी प्रमाणात साठवण्यासाठी याचा वापर केला जात असे. बाजरी, गहू व तांदूळ साठवण्यासाठी वापरला जातो. क्षमता ८ ते १० किलो पर्यंत असते. मुख्यतः ते आयताकृती किंवा चौरस आकाराचे आहेत. लाकडी पेटी (संदूक): अशा प्रकारची संरचना कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश तसेच छत्तीसगड राज्यात वापरली जातात. तसेच यांची क्षमता ६० ते १०० किलो असते.बांबूची टोपली: हिमाचलप्रदेश, उत्तराखंड आणि आसाममध्ये वापरली जातात. बांबूच्या ट्रिंग/पट्ट्यांसह विणलेले तसेच शेणाने सारलेले असतात. फक्त वरील बाजूने उघडतात व यांची क्षमता ५ ते १० किलो पर्यंत असते.हरियाणा, यू.पी., पंजाब, मध्यप्रदेश, झारखंड आणि बिहारमध्ये मटका वापरला जातो. या प्रकारचे मटके वालुकामय चिकणमातीचे बनलेले असून कडक करण्यासाठी अग्नीत जाळले असतात तसेच पाण्याच्या रंगाने रंगवलेले असतात. त्यांची जाडी हि १ ते २ सें.मी. असते व क्षमता सुमारे ५ ते १० लिटर पर्यंत बदलते.





### महत्वाच्या घटना

१७१८ : जगातल्या पहिल्या मशीन गन बंदूकेचे पेटंट जेम्स पक्कल यांनी घेतले.
१७३० : रॉबर्ट वॉल्पोल युनायटेड किंग्डमचे पहिले पंतप्रधान झाले.
१८११ : पॅराग्वेला (स्पेनकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१८३६ : सूर्यग्रहणातील खग्रास स्थितीपुर्वी दिसणार्या 'बेलीज बीड्?स'चे शास्त्रज्ञ फ्रॅन्सिस बेली यांनी सर्वप्रथम निरीक्षण केले.
१९०५ : अमेरिकेतील नेवाडा राज्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या वेगास शहराची स्थापना करण्यात आली.
१९२८ : मिकी माऊस कार्टून प्लेन क्रेजी या शो मधून पहिल्यांदा प्रसारित केले गेले.
१९३५ : मॉस्को शहरात भुयारी रेल्वेची सुरूवात झाली.
१९४० : सॅन बर्नाडिनो, कॅलिफोर्निया येथे 'मॅक्डोनाल्डस'चे पहिले उपहारगृह सुरू झाले.
१९४० : दुसरे महायुद्ध हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९५८ : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ३ चे प्रक्षेपण केले.
१९६० : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ४ चे प्रक्षेपण केले.
१९६१ : पुण्याच्या चतु:शृंगी वीजकेंद्रात प्रचंड स्फोट होऊन ९ जणांचा मृत्यू
१९८० : संपूर्ण भारतीय बनावटीच्या गोदावरी या पाणबुडीचे माझगाव गोदीमध्ये जलावतरण.
१९९३ : संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांनी १५ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय परिवार दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.
२००० : दक्षिण काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील मंडीपुरा येथे अतिरेक्यांनी पेरलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात जम्मू काश्मीरचे ऊर्जा राज्यमंत्री गुलाम हसन बट यांच्यासह ५ जण ठार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : देवेंद्रनाथ टागोर, बंगाली समाजसुधारक.
१८५९ : पिएर क्युरी, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ.
१८९२ : भारतीय वकील व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि राजकारणी तसचं, भारतीय लोकसभा मतदार संघाचे सदस्य आणि मध्य प्रदेशचे माजी राज्यपाल हरि विनायक पाटसकर यांचा जन्मदिन.
१९०३ : रा. श्री. जोग साहित्य मीमांसक, कवी व विचारवंत (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९७७)
१९०७ : 'सुखदेव' थापर क्रांतिकारक (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९१४ : तेनसिंग नोर्गे, एव्हरेस्ट वर प्रथम चढाई करणार्या एडमंड हिलरी यांचे सहकारी.
१९२६ : माजी भारतीय नौदल अधिकारी महेंद्रनाथ मुल्ला यांचा जन्मदिन.
१९६७ : माधुरी दिक्षीत-नेने अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : संत जनाबाई.
१७२९ : वैशाख व. १४, शके १६५१ मराठेशाहीच्या आपत्?प्रसंगी पराक्रम गाजवणारे खंडेराव दाभाडे यांचे निधन.
१९५८ : मुगल राजघराण्यातील प्रमुख भारतीय इतिहासकार यदुनाथ सरकार यांचे निधन.
१९९३ : फील्डमार्शल के. एम. करिअप्पा स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख (जन्म: २८ जानेवारी १८९९)
१९९४ : पी. सरदार, चित्रकार व दिनदर्शिका चित्र निर्माता.
१९९४ : ओम अग्रवाल जागतिक हौशी स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेतील एकमेव भारतीय विजेता
२००० : सज्जन जुन्या जमान्यातील चित्रपट व नाट्य अभिनेते. तलाक (१९५८), बीस साल बाद (१९६२)
२००३ : अमेरिकेतील प्रसिद्ध गायिका जून कार्टर यांचे निधन
२००७ : लिबर्टी विद्यापीठाचे स्थापक जेरी फेलवेल यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९३३)
२०१० : भारताचे ११ वे उपराष्ट्रपती व राजस्थान राज्याचे माजी मुख्यमंत्री भैरोसिंह शेखावत यांचे निधन.

# बियाण्यांची साठवणूक करण्याची योग्य पद्धत

आधुनिक शेती पद्धतीत शुद्ध व चांगले गुणधर्म असलेल्या बियाण्याचा वापर हे सर्वात स्वस्त असे भांडवल आहे. म्हणूनच अंकुरक्षम व अधिक जोम असलेल्या बियाण्याची पेरणीच्या वेळी सहज उपलब्धता हे अपेक्षित उत्पन्न मिळवण्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे. यजुर्वेदासारख्या पुरातन साहित्यातसुद्धा बियाणे हे अंकुरक्षम असावे, असे चांगल्या बियाण्याचे महत्त्व सांगितले आहे. शुद्ध व चांगली गुणवत्ता असलेल्या बियाण्याचा वापर केल्याशिवाय शेतीत मशागत, खते, पाणी इ. रूपाने दिलेल्या भांडवलाचा पुरेपूर मोबदला मिळू शकणार नाही, याची जाणीव शेतकऱ्यांना झालेली आहे.

बहुतांश शेतकरी आता बीजोत्पादन करू लागले आहेत. बीजोत्पादन करताना विशेष काळजी घेऊन चांगल्या प्रकारचे व शुद्ध बियाणे तयार करतात. बीजोत्पादन करून निर्माण केलेले शुद्ध व गुणवत्ता असलेले बियाणे हे साठवणुकीत अधिक काळपर्यंत अंकुरक्षम ठेवणे महत्त्वाचे असते. त्यासाठी बी योग्य प्रकारे साठवणे हा सर्वात स्वस्त मार्ग आहे. खरे पाहता बियाण्याची योग्य प्रकारे साठवण करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे बियाण्यांची अंकुरक्षमता व जोम यात होणारी घट कमी करणे, हा होय, बियांच्या अंकुरणक्षमतेमध्ये होणारी घट ही त्याच्या साठवणूक प्रक्रियेत पूर्णतः थांबवता येत नाही की वाढवताही येत नाही. म्हणून होणारी घट ही कमीत कमी प्रमाणात कशी होईल, हे पाहणेच जास्त व्यवहार्य ठरते. धान्य साठवणुकीत साधारणतः १०% धान्याचा नाश होतो. अशा प्रकारे आपल्या देशात अंदाजे ४५०० कोटी रुपयांचे तर महाराष्ट्रात ३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या धान्याचा नाश होतो. यावरून काळजीपूर्वक साठवणुकीचे महत्त्व सहज लक्षात येते. पीक काढणीपासून ते परत पेरणीपर्यंत मधला काळ जवळजवळ पाच ते सात महिन्यांचा असतो. एका वर्षात त्याच पिकाचे जर दोन हंगाम घेतले, तर हा काळ एक किंवा दोन महिनेही असू शकतो. या काळात बियांची साठवण करावी लागते. तसेच जरुरीपेक्षा जास्त प्रमाणात तयार केलेल्या बियाण्यांची साठवण करावी लागते. सर्वसाधारणपणे या प्रकारच्या साठवणुकीची आवश्यकता बीजोत्पादन करणाऱ्या संस्थांना किंवा संघटनांना भासते. यात बियाणे १२ ते १८ महिन्यांपर्यंत साठवावे लागते. मूलभूत बियाणे, जनुकीय प्रजाती, त्याचप्रमाणे बीज परीक्षण प्रयोगशाळेत चाचणी केलेले बियाण्यांचे नमुने इत्यादीची साठवण ही दीर्घ काळापर्यंत करावी लागते. अंकुरणक्षमता कमी न होता दीर्घकाळ साठवणूक करण्याच्या पद्धती अधिक खर्चिक असतात. बियाणे पक्व झाल्याबरोबर अंकुरणक्षमता कमी व्हावयास सुरुवात होते, ती बियाण्याची पेरणी होईपर्यंत तशीच सुरू राहते. या काळात ह्या बियाणांना अनेक अवस्थांमधून जावे लागते. यात अ ) कापणीपूर्वी शेतात, ब) कापणी ते प्रक्रिया होईपर्यंत, क) प्रक्रिया झाल्यानंतर विक्री होईपर्यंत, ड) वाहतुकीत, इ) किरकोळ विक्रीच्या ठिकाणी, ई) शेतकऱ्यांच्या घरी. अशा प्रत्येक ठिकाणी बियाण्याची साठवण केली जाते व तेथील वातावरणाचा बियाण्याच्या अंकुरणक्षमतेवर परिणाम होत असतो. बियांच्या अंकुरणक्षमतेमध्ये नियमित परंतु हळूहळू घट होत असते. बियांची अंकुरणक्षमता व जोम यातील साठवणुकीच्या काळात होणारी घट याचा संबंध पाहिल्यास असे आढळते, की प्रथम बियांचा जोम कमी होतो व नंतर अंकुरणक्षमता कमी होते.

साठवणुकीत बियाण्याचे आयुष्यमान हे हवेतील आर्द्रता आणि तापमान या घटकांवर बरेचसे अवलंबून असते. हॅरिंग्टन नावाच्या शास्त्रज्ञाने १९५९मध्ये याचे महत्त्व ओळखून त्यांचे बियाण्यांच्या आयुष्यावर होणारे परिणाम दाखविण्यासाठी दोन साधे नियम दिले आहेत. बियाण्यातील ओलाव्याच्या प्रमाणात होणाऱ्या प्रत्येक एक टक्का वाढीमुळे बियाण्याचे आयुष्य निम्म्याने कमी होते. बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण अंदाजे ५- १४ टक्के दरम्यान असल्यास हा नियम लागू होतो. बियाणे साठवणुकीच्या तापमानात होणाऱ्या प्रत्येक ५ डिग्री सेल्सिअस वाढीमुळे बियाण्याचे आयुष्य निम्म्याने कमी होते. हा नियमसुद्धा तापमान ० ते ५० डिग्री सेल्सिअस दरम्यान असेल तेव्हाच लागू होतो. साठवणुकीत बियाण्याची उगवण क्षमता व जोम यावर प्रामुख्याने बियाण्यातील ओलाव्याचे किंवा वातावरणातील आर्द्रतेचे प्रमाण, साठवणुकीच्या काळातील तापमान, साठवणुकीच्या काळातील वायू, . बियाण्याची भौतिक स्थिती, आनुवंशिकता, अतिसूक्ष्म जिवाणू व किडी आणि बियांची सुरुवातीची उगवण क्षमता व जोम याचा परिणाम होतो. यांपैकी बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण आणि बीज भांडारातील तापमान व वातावरणातील आर्द्रता यांचे महत्त्व अधिक आहे. वातावरणातील आर्द्रता जास्त असल्यास त्यात साठवलेल्या बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाणही वाढते. आर्द्रतेचे प्रमाण ० ते २५% दरम्यान असल्यास, बियाण्यातील ओलावा अधिक जलद प्रमाणात वाढतो. २५ ते ७०% दरम्यान मध्यम गतीने, तर ७० ते १००% दरम्यान पुन्हा जलद गतीने वाढतो. सर्वसाधारणपणे बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १२ टक्क्यांपेक्षा जास्त वाढल्यास ते बियाण्याच्या अंकुरणक्षमतेला हानिकारक असते. तसेच बियांची चांगल्या प्रकारे व अधिक काळपर्यंत साठवणूक करण्यासाठी थंड वातावरण अधिक उपयुक्त असते. अतिथंड (१५ डिग्री सेल्सिअसच्या खाली) व अतिउष्ण (४० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त) तापमान बियाण्याला हानिकारक असते. ५ डिग्री सेल्सिअस ते पाण्याच्या गोठणबिंदू दरम्यान (४ डिग्री सेल्सिअस) तापमान साठवणुकीस फायद्याचे असते. साधारणपणे तापमानात जसजशी वाढ होत जाते, तसतशी बियाण्याच्या

आयुष्यमानात घट होत जाते. : जीवनासाठी प्राणवायू जरी आवश्यक असला तरी बियांची साठवणूक प्राणवायूविरहित जागेत सुरक्षितपणे करता येते. नत्रवायू हा इतर कुठल्याही वायूपेक्षा बियाण्यांचे साठवणुकीतील आयुष्यमान वाढविण्यात अग्रेसर ठरला आहे. त्याचप्रमाणे बियाण्यांची काढणी करताना व त्यावर प्रक्रिया करताना बियाण्यास पोहोचणारी इजा ही बहुतेक करून साठवणुकीच्या काळात उगवण शक्ती कमी करण्यास कारणीभूत होते. आनुवंशिकतासुद्धा बियांची साठवणूक शक्ती जास्त अथवा कमी असण्यासाठी कारणीभूत असते.बुरशी व किडीमुळे होणारा उपद्रव : अतिसूक्ष्म जीवाणू, बुरशी व धान्य भांडारातील किडी यांच्या प्रादुर्भावाने बियाण्यांची उगवण शक्ती व जोम यावर अनिष्ट परिणाम होतो. वेगवेगळ्या बुरशींच्या प्रकारांपैकी ॲस्परजीलस व पेनिसिलीयम या प्रकारच्या बुरशीच्या निरनिराळ्या जाती, मुख्यतः भांडारात बियाण्यांना जास्त अपाय पोहोचवतात. अर्थात त्यांचा उपसर्ग किंवा प्रादुर्भाव वातावरणात आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्यावरच होतो. या बुरशीमुळे बियाण्यांची उगवण शक्ती कमी होणे, बियांच्या अथवा त्यांच्या अंकुराच्या रंगात बदल होणे, बियांत विषारी बुरशीजन्य द्रव्ये तयार होणे, त्यांना कुबट वास येणे आणि त्या केकसारख्या एकमेकांना घट्ट चिकटून बसणे असे नुकसान होते. या प्रकारच्या नुकसानीमुळे बिया कुजतात. किडींच्या प्रादुर्भावामुळे बियांची उगवण शक्ती अनेक मार्गांनी कमी होते. भांडारात किडींची संख्या जास्त झाली तर भांडार व त्यातील वातावरण तापमान, आर्द्रता व कार्बन डाय ऑक्साईड वायूचे प्रमाण वाढल्याने निरुपयोगी होते. अळ्या अथवा किडी मुख्यतः बियांतील अंकुर खातात. किडीमुळे बियांमध्ये बुरशीचा सुद्धा प्रादुर्भाव होतो. कित्येक वेळा किडी बियांत कोष अथवा जाळ्या तयार करतात. त्यामुळे बियाणे स्वच्छ करताना अडथळा येतो व बरेचसे बियाणे वायाही जाते. त्याचप्रमाणे किडीच्या नायनाटासाठी वापरलेल्या औषधांचा बियाण्यांच्या उगवण शक्तीवर अनिष्ट परिणाम होऊ शकतो.

रासायनिक औषधांचा वापर : याण्याचे भांडारात होणारे टाळण्यासाठी कीटकनाशके व बुरशीनाशकांचा उपयोग अधिक प्रभावशाली होऊ शकतो. बियाणे प्रक्रिया केंद्रात साफ केल्यानंतर त्यास थायरम, कॅप्टन, विटावेक्स, बेनलेट, सेरेसान, मोनोसान, अग्रॉसॉन, प्लॅंटवॅक्स आदी पारायुक्त अथवा ताम्रयुक्त बुरशीनाशकांपैकी पिकानुसार योग्य ते बुरशीनाशक शिफारस केलेल्या प्रमाणात चोळावे. त्यामुळे भांडारात असे बियाणे पुढील पेरणी हंगामापर्यंत सुरक्षित राहू शकते. बियाणे भांडारात ठेवण्यापूर्वी भांडार काळजीपूर्वक स्वच्छ करून घेणे अधिक महत्त्वाचे असते. यासाठी बीजभांडारात ०.५% मेलॅथिऑनची भिंतीवर, छतावर आणि बी ठेवण्यासाठी लागेल तेवढ्या जमिनीवर फवारणी करावी किंवा धुरीजन्य कीटकनाशके वापरावी.

इतर धुरीजन्य कीटकनाशके : एच.सी.एन. पावडर प्रकारातील हे धुरोक्य कीटकनाशक आहे. हवेतील आर्द्रतेबरोबर संयोग झाल्यावर यातून वायू बाहेर पडून कीटकांचा नाश करते. हे कोरड्या पदार्थासाठी किंवा धान्यासाठी वापरतात. फळे किंवा भाजीपाला साठवणुकीसाठी याचा वापर करू नये.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# आ. खोतकर यांच्या प्रयत्नमुळे गरिबाला न्याय मिळाला

## जिल्हा रुग्णालय येथे एमआरए सेंटर सुरु



जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली असून, आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे अत्याधुनिक सेंटरचे उद्घाटन आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले.काही दिवसांपूर्वी मुंबई येथे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेतली होती. या बैठकीदरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे सेंटर उपलब्ध करून देणे, आधुनिक आरोग्य सुविधा वाढवणे तसेच नागरिकांना तातडीच्या वैद्यकीय सेवा मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली होती.

या बैठकीनंतर तातडीने निर्णय घेत जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे आधुनिक मशीन मंजूर करण्यात आले. आज या सेंटरचा शुभारंभ करण्यात आला असून, यामुळे जालना जिल्ह्यातील रुग्णांना आता तपासणीसाठी छत्रपती संभाजीनगर, पुणे किंवा इतर शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. कमी वेळेत आणि कमी खर्चात स्थानिक पातळीवरच अत्याधुनिक तपासणी सुविधा उपलब्ध होणार आहे. याशिवाय, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे मशीन देखील २४ तारखेपासून सुरू करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळणार आहे. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना आ. श्री खोतकर म्हणाले की, जालना जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम व्हावीत, रिक्त वैद्यकीय पदे भरली जावीत, तसेच आधुनिक वैद्यकीय यंत्रणा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. जालना जिल्ह्याच्या आरोग्य क्षेत्रासाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे असून, नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या या प्रयत्नांचे स्वागत केले आहे. या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब गोरे, डॉ. राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकित्सक , डॉ.राजेंद्र गाडेकर अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. प्रदीप कुलकर्णी रेडिओलॉजिस्ट, डॉ.वायाळ , डॉ.मनोज जाधव, व तांत्रिक अधिकारी कर्मचारी रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

# मनरेगा विभागात आर्थिक शुकशुकाट !

### शेतकऱ्यांचे अनुदान देण्याची मागणी....

### घरकुल योजनेचे अनुदान एजंट विनोद मुळे रखडले !

### प्रति घरकुल १० हजार रुपये कमिशन दिल्यास अनुदान

पाथर्डी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाद्वारे ग्रामविकास विभागाद्वारे राबविण्यात येत असलेले ग्रामीण भागातील अत्यंत महत्त्वपूर्ण योजना मनरेगा तसेच राष्ट्रीय घरकुल योजना पाथर्डी तालुक्यात प्रभावीपणे राबवली जात असताना मात्र महसूल विभागाच्या घरकुल लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास रेती किंबहुना वाळू देण्याच्या निर्णयाचा घरकुल लाभार्थ्यांना फायदा तर नाही परंतु प्रत्येक घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती देण्याच्या नावाखाली अवैध आणि बेकायदेशीर वाळू वाहन परवाना महसूल प्रशासनाने दिल्याने ग्रामीण भागात प्रति ब्रास ५००० ते सहा ब्रास चे ४० हजार रुपये घरकुल लाभार्थ्यांकडून उकळले जात आहेत यामुळे घरकुल योजनेचा फज्जा उडाल्याचे ग्रामीण भागात चित्र निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागातील हजारो घरकुल लाभार्थ्यांना त्यांचे घरकुलचे हप्ते वेळेत दिले गेले नाहीत यासाठी मनरेगा विभागातील काही एजंट विनोद कर्मचाऱ्यांनी प्रति घरकुल अनुदान मंजुरीसाठी पाच ते दहा हजार रुपये कमिशन स्वरूपात उकडल्याचे ठोस पुरावे हाती लागले आहेत तसेच मनरेगा अंतर्गत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने पाथर्डी पंचायत समिती अंतर्गत मनरेगा योजनेच्या माध्यमातून लाभार्थी शेतकऱ्यांना विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत परंतु केंद्र शासनाचा ६०% टक्के वाटा आणि राज्य शासनाचा ४०% वाटा असलेल्या या मनरेगा योजनेच्या गेल्या तीन महिन्यापासून मजुरांचे बिले द्यायला पंचायत समिती मनरेगा विभागाकडे बजेट नसल्याने पंचायत समिती मनरेगा विभागाचा शुकशुकाट झाला आहे यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांनी स्वतःच्या जमिनीमध्ये विहिर खोदण्यासाठी स्वतःची फाटक्या तुटक्या संसारातली तुटपुंजी असलेली रक्कम लावली आहे अशातच मजुरांचे पैसे द्यायला सुद्धा रक्कम नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे.

> मनरेगा अंतर्गत विहीर मिळाल्या स्वतःच्या कष्टातून कमावलेल्या पैशातून मजुरांचे पैसे द्यावे लागत आहेत अशातच कांदा कापूस ऊस हरभरा गहू उडीद इत्यादी शेतीपिकाला भाव नाही यामुळे प्रचंड आर्थिक ताणतणाव निर्माण झाला आहे घर संसार चालवावा लागतो यामुळे मजुरांचे पैसे कसे द्यावे असा प्रश्न पडला आहे अशातच घरकुल अनुदान रखडले आहे घरकुल अनुदान मंजुरीसाठी दहा हजार रुपये कमिशन मागितले जात आहे यामुळे तातडीने शासनाने विहिरीचे अनुदान व घरकुल अनुदान द्यावे असा आग्रह आहे
>
> –अनिल सावळेराम खेडकर (शेतकरी )

# गुणवंत विद्यार्थ्यांचा महापौरांच्या हस्ते सत्कार



जालना। प्रतिनिधी

संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालय येथे काल दि. ९ मे २०२६ रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. जालनाच्या प्रथम नागरिक तथा महापौर वंदनाताई मगरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थिनी वेदा राजू ठोंबरे हिने इयत्ता दहावी परीक्षेत ९६.६० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. तिच्यासह इतर गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमास शाळेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव श्री. सुरेश कुलकर्णी, विजयराव देशमुख, श्री. केशरसिंह बागेरियासर शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणातही असेच यश संपादन करावे, असे प्रतिपादन केले.

# नशा गोळ्याचे रॅकेट उद्ध्वस्त; अकराशे गोळ्या, ७६ सीरपच्या बाटल्या जप्त

जालना (प्रतिनिधी) नशाच्या बटन गोळ्यांची विक्री करणाऱ्या मुख्य सुत्रधारास बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगावराजा येथून जालना पोलीसांनी अटक करुन त्याच्याकडील अकराशे बटन गोळ्या आणि ७६ सिरप जप्त जप्त करण्यात आली. तसेच याप्रकरणी जालना शहरातून एका आरोपीलाही अटक करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर अशी माहिती

जिल्हा पोलीस अधिक्षक तेगबीरसिंह संधू यांनी कदीम जालना पोलीस ठाण्यात पत्रकार परिषदेत माहिती दिली. याचसोबत पोलिसांनी आणखी दोन यशस्वी

कारवाई करीत पिस्तुलसह दोन काडतूस बाळगणाऱ्या आणि खंजीर घेऊन फिरणाऱ्याला अटक केली आहे. एकंदरीत ३ यशस्वी कारवाई केल्या अशी माहिती पोलीस अधीक्षक यांनी दिली.

की, दि. २८ एप्रिल रोजी कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुना जालन्यातील नुतन वसाहत उड्डाण पुलाखाली साईकिर्ती हॉटेल समोर सय्यद सलमान सय्यद गफार (रा. बारबार गल्ली, जुना

जालना) हा नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या बटन गोळयाची विक्री करित असल्याची खात्रीहिर माहिती मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे व कर्मचाऱ्यांनी अन्न औषध प्रशासन विभागाचे अधिकारी आणि दोन पंचासह त्याठिकाणी छापा टाकुन मुद्देमात जप्त करण्यात आला होता,

या गुन्हयाच्या पुढील तपासामध्ये साखळी पद्धतीने पुन्हयाचा मुख्य सुत्रधार व गुंगीकारक गोळ्या व औषध रवठा करणाऱ्या आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. नशेसाठी वापरण्यात येणाऱ्या जप्त साठ्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

एल्प्रासेफ ०.५, अनिक्स्ट ०.५, रेस्टी १०.५, टिका ०.५ ११०० गोळ्या पाकिटे ड्रग्स (बटन गोळी) एकुण २९ पाकिट ३२५ टॅबलेट (बटन गोळी) टॉरोक्स कफ सिरप २५ गग, मंझाटुस कफ सिरप ५१ नग, नायट्रोसन टॅबलेट्स १४० गोळ्या, असा एकुण २५ हजार रुपये किंमतीचा साठा आरोपीकडून जप्न करण्यात आला आहे.

## थोडक्यात



### पात्रुड शाळेची माध्यमिक शालांत परीक्षेत गरुड झेप

माजलगाव। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शैक्षणिक वर्षे २०२५-२०२६ च्या एस, एस ,सी बोर्ड परीक्षेत माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील शाहू माध्यमिक विद्यालय पात्रुड या शाळेने नेत्रदीपक यश संपादन करून यशाची गरुड झेप घेतली आहे. विद्यालयाचा या वर्षीच्या निकाल ८४% टक्के निकाल लागला असून विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीन्यासह उत्तीर्ण होऊन शाळेचे आणि पालकांचे नाव लौकिक केले आहे या गुणवंत विद्यार्थामध्ये प्रथम क्र कु.भोसले अंजली कैलास ८२.८०, द्वितीय क्र कु सातपुते अश्विनी सुग्रीव ८०.२० त्रितीय कु काळे अनुराधा दामोदर ७४% चि.शिंदे शिवम पुसाराम ७३.६० , चि.शेख इमाद वहीद, ७२.८०, चि.जंगले विजय राजाराम ७१.२० त्याचा या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री वाघमारे ए.एम, शाळेचे मुख्याध्यापक श्री मात्रे बी. के तसेच शाळा समिती अध्यक्ष गिन्यांदेव नावडकर,वहिदा पटेल,फजलु पटेल,भगवान कटारे, तसेच शाळेतील पवार डी. टी, जगताप आर.एम,वाडचकर के.एस,खांडेकर बि. पी गायकवाड व्ही.एस,बनसोडे बि. टी, सोनवणे ए.ए आदींनी अभिनंदन केले.

### देखभाल दुरुस्तीच्या कामात उमेश केकान चा लाखो रुपयांचा भ्रष्टाचार?

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी पंचायत समिती येथे कार्यरत असलेला तत्कालीन सार्वजनिक बांधकाम उअभियंता उमेश केकान याने त्याच्या प्रशासकीय सेवेतील कार्यकाळात जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या आरोग्य शिक्षण आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील शाळा देखभाल दुरुस्ती नवीन इमारती बांधणे आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे देखभाल दुरुस्ती व नवीन इमारती बांधणे तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत पाथर्डी तालुक्यातील बहुतांश तीर्थक्षेत्र देवस्थान विकास निधीच्या योजनेच्या कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे यामुळे तात्कालीन सार्वजनिक बांधकाम उपअभियंता उमेश केकान याची खातेनिहाय चौकशी करून उमेश केकाण या भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला निलंबित करावे या संदर्भात सार्वजनिक बांधकाम मंत्रालय सचिव मनीषा पाटणकर म्हैसकर यांना अहिल्यानगर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना निवेदन देऊन उमेश केकान याला प्रशासकीय सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

### मनमाड-दौंड रेल्वे मार्गाच्या कामाला गती!

मनमाड। प्रतिनिधी

दौंड-मनमाड रेल्वे मार्गाच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी सोमवारी (दि. ११) मनमाड येथील अश्विनीनगर परिसरात रेल्वे प्रशासन व भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांच्या वतीने भूसंपदानाकरिता मोजणी करण्यात आली. सुरुवातीला या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करण्यात येण्याबाबत चर्चा होती; मात्र प्रत्यक्षात रेल्वे रुळापासून अवघी १० ते १२ मीटर जागा प्रकल्पासाठी घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाल्याने अनेक रहिवाशांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. मनमाड येथे रेल्वेकडून विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प आकार घेत असून, दौंडहून येणाऱ्या रेल्वेसाठी नव्या प्रकल्पांतर्गत जमीन संपादन करण्याबाबत प्रशासनाने जाहीर निवेदने प्रसिद्ध करीत, तसेच जवळपास १०० रहिवाशांना मोजणीबाबत सूचना दिल्या होत्या. यात अश्विनीनगर, गुजराती मळा, कलावती आई मंदिर परिसर या भागाचा समावेश होता. सोमवारी मोजणीसाठी रेल्वेचे वरिष्ठ इंजिनिअर सुधांशू, भूमी अभिलेखचे बर्डे, मनमाड पालिकेचे अनिल गवळी आदी उपस्थित होते. यावेळी रेल्वे लाइनपासून पुढील १० ते १२ मीटर जागा अधिग्रहित करण्याचे संकेत अधिकाऱ्यांनी दिले. त्या पद्धतीने मोजणी व मार्किंग करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते नाना शिंदे, बबन सांगळे, भाऊसाहेब सांगळे, सौरभ कुलकर्णी, नगरसेवक अमोल नरवडे यांच्यासह रहिवाशांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.जमीन संपादीत केल्यानंतर प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यावर प्रशासनाने ड्रेनेजकडे लक्ष द्यावे, संरक्षक भिंत उभारावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते नाना शिंदे व रहिवाशांनी केली. ड्रेनेजबाबत रेल्वे अधिकारी सुधांशू यांनी स्थानिक नगरपरिषदेकडे निर्देश करण्यास सांगितले.

# जेपीसी बँकेच्या चेअरमनपदी सतीश पंच तर व्हाईस चेअरमनपदी किशोर देविदान



जालना। प्रतिनिधी

व्यापाऱ्यांची बँक म्हणून संपूर्ण जिल्ह्यात नावलौकिक असलेल्या 'दि जालना पीपल्स को-ऑप. बँक लि.' च्या चेअरमनपदी सतीश सिताराम पंच तर व्हाईस चेअरमनपदी किशोर ओमप्रकाश देविदान यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या निवडीमुळे सतीश पंच यांना तिसऱ्यांदा बँकेचे चेअरमनपद भूषविण्याचा मान मिळाला आहे. दि. २४ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत चेअरमन संजय मुथा आणि व्हाईस चेअरमन सौ. सुनंदा अग्रवाल यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले होते. या रिक्त पदांसाठी आज, बुधवार दि. १३ मे रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडली. अध्यासी अधिकारी म्हणून सहाय्यक उपनिबंधक पी. बी. वरखडे यांनी काम पाहिले. दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने चेअरमनपदी सतीश पंच तर व्हाईस चेअरमनपदी किशोर देविदान यांची बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा श्री. वरखडे यांनी केली.

या निवड प्रक्रियेवेळी संचालक संजय प्रेमराज मुथा, सौ. सुनंदा नंदकिशोर अग्रवाल, संजय कैलासचंद्र भरतीया, सुनील नेहरूलाल चौधरी, ॲड. अनिल चैनराज संचेती, राजकुमार रामगोपाल दायमा, हितेंद्र कांतीलाल शाह, अभय अशोककुमार करवा, जयेश बलवंतराय बाविशी, अनुराग कैलासचंद्र अग्रवाल, सुनील रामचंद्र बियाणीविरेंद्र अमरचंद धोका, सौ. वर्षा महेश भक्कड, सुभाष जगन्नाथराव वाघमारे, दिपक जमनादास भुरेवाल, तज्ञ संचालक सीए निखिल कैलासचंद बाहेती आदींची उपस्थिती होती. या निवडीबद्दल जिल्हयातील बँकिंग क्षेत्रातून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

### बँकेच्या प्रगतीसाठी कटिबद्ध-सतीश पंच

निवडीनंतर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना नूतन चेअरमन सतीश पंच म्हणाले की, बँकेच्या २७ वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या शिदोरीवर सभासदांनी आणि संचालकांनी माझ्यावर तिसऱ्यांदा जो विश्वास टाकला आहे, त्या विश्वासाला मी कुठेही तडा जाऊ देणार नाही. यापूर्वी २०१०, २०२० आणि आता २०२६ चेअरमनपदाचा मान मला मिळाला आहे. तीनही वेळा बँकेच्या प्रगतीचा आलेख उंचावत असतानाच मला ही जबाबदारी मिळाली आहे. माझ्या मागील कार्यकाळात, म्हणजेच ३१ मार्च २०२१ अखेर बँकेने १ कोटी १ लाख १४ हजार रुपयांचा ऐतिहासिक निव्वळ नफा प्राप्त केला होता. ही बँकेच्या भक्कम आर्थिक स्थितीची मोठी पावती होती. बँकेने वसुलीची प्रक्रिया अत्यंत प्रभावीपणे राबवली, ज्यामुळे त्या काळात निव्वळ एनपीए शून्य टक्के राखण्यात आम्हाला यश आले होते. बँकेच्या उत्तम कामगिरीची दखल घेत रिझर्व्ह बँकेने 'प्रायोरिटी सेक्टर सर्टिफिकेट' अंतर्गत ३.४० लाखांचे बक्षीस देऊन बँकेचा गौरव केला होता, याची आठवण करून देत आगामी काळात जास्तीत जास्त नफा मिळवून ठेवीदार, सभासद आणि खातेदारांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी मी आणि माझे संचालक मंडळ अहोरात्र काम करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६८**
**दिनांक - ०९/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती संगिता संतोष राजपुत रा. सौंदलगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मयत सासू रामकवर दौलतसिंग राजपुत सौंदलगाव यांचा मृत्यू दिनांक १०/०२/२०१५ रोजी झाला असून जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रामकवल दौलतसिंग राजपुत | सासू | १०/०२/२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

## तहसीलदार, मामलेतदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अंबड

**प्रशासकीय इमारत ता अंबड**
Email: tahsildarambad@gmail.com
**दुरध्वनी संदेश (०२४८३/२७५०२६)**
**शि.२०२६/जमा-१/कावी- ३६३**
**दिनांक ०७.०५.२०२६**

ज्याअर्थी मौजे गोरी येथील गट नं. ५५ मधील वहीवाटीच्या रस्त्याबाबत. अर्जदार संगीता नवनाथ पवार रा.शहागड ता.अंबड जि. जालना यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ०७.०५.२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतीवादी :- १. कुंडलिक धार, २. नामदेव कनेजे, ३. प्रल्हाद कनुजे, ४. रामदास मिरगे, ५. सर्जेराव मिरगे, ६. सोजरबाई कोकाटे ७. वैजीनाथ खेंगरे अजिनाथ खेगरे, रा. गोरी ता. अंबड जि. जालना, वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत मौजे गोरी येथील गट नं. ५५ मधील वहीवाटीच्या रस्त्याबाबत निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवून कळविण्यात येते की, ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखे पासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक २१.०५.२०२६ रोजी दु. २.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल.

**स्वाक्षरित**
**तहसीलदार अंबड**

# पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईमुळे पानपट्टीवरील गुटखा गायब

### किराणा दुकानातून सुगंधीत सुपारीची सर्रास विक्री अन्न व औषध प्रशासनाचे झोपेचे सोंग

मंठा। प्रतिनिधी

महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा व सुगंधित सुपारी विकणाऱ्या पान टपऱ्यांना लक्ष करीत मंठा पोलिसांनी धडाकेबाज कारवाई केली. मात्र, शहरातील किराणा दुकानातून आजही विविध नावाच्या सुगंधी सुपारीची विक्री सर्रासपणे सुरू आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाने करणे आवश्यक असताना त्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे सांगण्यात येते.

केमिकल युक्त गुटखा खाण्यामुळे अनेकांना कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराला सामोरे जावे लागले. यामध्ये अनेक जणांना आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने अशा गुटखा व सुगंधीत सुपारीवर बंदी आणली. मंठा पोलिसांनी धाडसत्र सुरू केल्यामुळे पान टपऱ्यावरील प्रतिबंधित गुटखा व सुगंधित सुपारीला लगाम बसला.

आतापर्यंत अन्न व औषध प्रशासनाने यापूर्वी थातूरमातूर कारवाया करून " चिरीमिरी " घेऊन सोईस्कर दुर्लक्ष केले. मंठा शहरातील किराणा दुकानातून सर्रासपणे मोगली, राजू विलायची, नखरेली, मस्ती, स्वीटी अशा नावाच्या सुपारीची खुलेआमपणे विक्री होताना दिसत असून अन्न व औषध प्रशासनाचे संबंधित अधिकारी केवळ हप्ते वसुलीसाठी येतात असे सांगण्यात येते. त्यामुळे जिल्हाधिकारी जालना यांनी किराणा दुकानातून खुलेआमपणे सुगंधित सुपारी विकणाऱ्या विक्रे त्यांविरुद्ध तात्काळ कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# बीडच्या शिक्षणाधिकाऱ्याकडून उच्च न्यायालयाचा अवमान

## शिक्षणाधिकारी व संबंधित लिपिकास उच्च न्यायालयाची नोटीस

बीड । प्रतिनिधी

जय हिंद विद्या प्रसारक मंडळ तांदळा येथील लिपिक सुधाकर शेळके यांना संस्थेने पदावरून काढून टाकले होते. शेळके यांना रुजू करण्यात यावे असे आदेश शाळा प्राधिकरणाने दिले होते. या आदेशाच्या विरोधात संस्थेच्या सचिव भारती पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने शाळा प्राधिकरणाच्या आदेशाला स्थगिती दिली होती. मात्र तरीही शिक्षणाधिकारी प्रिया राणी पाटील यांनी सुनावणी घेऊन संबंधित लिपिक शेळके यांना रुजू करून घेण्यात यावे असे आदेश दिले. या संदर्भात संस्थेच्या सचिव भारतीय पाटील यांनी हा उच्च न्यायालयाचा अवमान असल्याचे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. हा न्यायालयाचा अवमान असल्याने या अवमान याचिकेवर १५ जून रोजी न्यायालयाने सुनावनी ठेवली आहे. या संदर्भात शिक्षणाधिकारी प्रिया राणी पाटील व संबंधित लिपिक शेळके यांना नोटीस बजावण्यात आली असल्याची माहिती एड. नरसिंह जाधव यांनी दिली.

या बाबत सविस्तर माहीती अशी की जयहिंद विद्या प्रसारक मंडळ तांदळा ता. गेवराई जि. बीड संस्थेच्या सचिव भारती विशाल पाटील यांनी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड प्रियारणी पाटील यांच्या विरोधामध्ये अवमान याचीका क्रमांक २८१/२०२६ ॲड. नरसिंह जाधव यांच्या मार्फत दाखल केली असून सदरील प्रकरणांमध्ये साहेबराव पाटील विद्यालय तांदळा या शाळेतील तत्कालीन कनिष्ठ लिपिक सुधाकर मधुकरराव शेळके यांना नोकरीमधून कमी करण्याच्या आदेशा विरुद्ध शाळा न्यायाधीकरण लातूर येथे अपील दाखल केले होते. सदरील अपिलाचा निकाल ०४/०२/२०२५ रोजी न्यायाधीकरण लातूर यांनी दिला व संबंधित कनिष्ठ लिपिक सुधाकर मधुकर शेळके यांना नोकरी मध्ये पूर्ववत रजू करून घेण्याचे आदेश दिले होते. सदरील आदेशा विरुद्ध संस्थेचे सचिव व मुख्याध्यापक यांनी मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये याचिका क्रमांक ३९३९/२०२५ दाखल केली होती. सदरील याचिकेमध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांना देखील प्रतिवादी करण्यात आले होते. सदरील याचिकेची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी झाली असता मा. उच्च न्यायालयाने शाळा न्यायाधिकरण्याच्या आदेशास स्थगिती दिली होती. सदरील स्थगिती आज पर्यंत चालू आहे. सदरील आदेशाची माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांना दिलेली होती. असे असताना देखील शिक्षणाधिकारी यांनी सुधाकर शेळके यांच्या अर्जावरून संस्थेस व शाळेस नोटीस काढून शाळा न्यायाधीकरणाचे आदेश पालन करण्यासंबंधी सुनावणीची नोटीस दिली. सदरील सुनावणी मध्ये देखील संस्थेचे सचिव व हेडमास्तर यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रियाराणी पाटील यांना मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २७/०३/२०२५ रोजी याचिका क्र. ३९३९/२०२५ मध्ये शाळा न्यायाधिकरणाच्या आदेशास स्थगिती दिलेली ◀◀ पान ३ वर





# दुर्दैवी: परळीत जेवताना घास घशात अडकून पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू

परळी । प्रतिनिधी

प्रवासादरम्यान जेवण्यासाठी थांबले असताना, अन्नाचा घास घशात अडकून एका पोलीस कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना परळी-अंबाजोगाई रस्त्यावर घडली आहे. संबंधित कर्मचारी हे जिल्ह्याबाहेर कार्यरत होते.



मिळालेल्या माहितीनुसार, सदर पोलीस कर्मचारी परळी-अंबाजोगाई रस्त्यावरील एका धाब्यावर जेवणासाठी थांबले होते. जेवत असताना अचानक अन्नाचा घास घशात अडकल्याने त्यांना तीव्र ठसका लागला व उलट्या सुरू झाल्या. यातच त्यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान पोलिस सूत्रकडून प्राप्त झालेल्या महिती नुसार दी. १२.०५.२०२६ रोजी १८.०० वा. देवेन्द्र रामरावजी गुजर वय - ५५ वर्षे रा.आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा हा जेवन करत असताना छातीत दुखु लागल्याने मयत झाला आहे. मजकुराचे खबरेवरुन सदर आ.मृ. मा.पो.नि.सो यांच्या आदेशाने आकस्मित मृत्यु दाखल करण्यात आला असून पुढील तपासकामी सफौ/२०४ टोले यांच्याकडे देण्यात आला. परळी ग्रामीण पो स्टे टोले हे करीत आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. परळी ग्रामीण पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. एका कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचाऱ्याचा अशा आकस्मिक निधनाने पोलीस दलासह परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

# महासांगवी शिवारात वादळी वाऱ्यासह गारपीट

## विजेचे खांब उन्मळून पडले, ऊस पिकाचे अतोनात नुकसान

पाटोदा । प्रतिनिधी

बुधवारी दुपारी महासांगवी व परिसरात अचानक आलेल्या तीव्र वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि गारपिटीने थैमान घातले. या नैसर्गिक आपत्तीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर मोठे नुकसान झाले असून, शेतातील उभ्या ऊस पिकाला वादळाचा मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी विजेचे खांब (लाईटचे पोल) मुळासकट उपटून शेतात कोसळल्याने संपूर्ण परिसरातील वीज पुरवठा खंडित झाला आहे.शेतकऱ्यांची पंचनाम्याची मागणी:वादळामुळे





हाताशी आलेले ऊस पीक जमिनीदोस्त झाले असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. वीज खांब कोसळल्यामुळे शेतात विद्युत प्रवाह उतरण्याची भीती निर्माण झाली असून, मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर, महसूल आणि कृषी विभागाने निष्काळजीपणा न करता तात्काळ महासांगवी शिवारात येऊन पिकांचे व पडझडीचे पंचनामे करावेत आणि बाधित शेतकऱ्यांना शासकीय आर्थिक मदत द्यावी, अशी तीव्र मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# दिवंगत माजी नगराध्यक्ष जाबेर खाँ पठाण यांच्या कुटुंबीयांचे आ. धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - परळीचे माजी नगराध्यक्ष म. जाबेर खाँ पठाण यांचे अल्पशा आजाराने नुकतेच दुःखद निधन झाले होते, आज माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी परळी शहरातील पठाण यांच्या निवासस्थानी भेट देऊन पठाण कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी पक्षात एकत्रित राहून शहराच्या विकासासाठी केलेल्या विविध कामांना व आठवणींना उजाळा देत धनंजय मुंडे यांनी जाबेर खाँ यांच्या स्मृतीस श्रद्धांजली वाहिली.



यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अय्युब भाई शेख, शकील कुरेशी यांसह आदी उपस्थित होते.

परळी पंचायत समितीचे माजी उपसभापती माधवराव मुंडे यांचेही केले सांत्वन ◀◀ पान ३ वर

# उर्दुघरला मिळाली तातडीने निधीसह मंजुरी

## आ.संदिप क्षीरसागरांनी मानले मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे आभार



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात उर्दु भाषेचे संवर्धन, साहित्य प्रसार आणि सांस्कृतीक चळवळीला गती देण्यासाठी बीड शहरात उर्दुघर उभारण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांचा मागील अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू होता. आणि त्यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, शासनाकडून बीड शहरात उर्दुघर उभारणीसाठी निधीसह मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.सुनेत्राताई पवार व उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे यांचे आभार मानले आहेत.

बीड शहरात उर्दुघर उभारणीसाठी गेल्या अनेक दिवसांपासून आ.संदीप क्षीरसागर प्रयत्नशील होते. या बाबत आ. क्षीरसागर ◀◀ पान ३ वर

# उन्हाचा तडाखा वाढला, पण जनसंपर्काचा वेग थांबला नाही

## शेकडो शुभकार्यांत उपस्थित राहून धस कुटुंबाने जिंकली जनतेची मने

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा आणि शिरूर विधानसभा मतदारसंघात सध्या एक वेगळेच राजकीय चित्र पाहायला मिळत आहे. प्रचंड उष्म्याच्या लाटेतही मतदारसंघातील प्रत्येक गावाशी थेट संपर्क ठेवत आमदार आणि संपूर्ण धस कुटुंब दररोज शेकडो शुभकार्यांना उपस्थित राहत जनतेशी असलेले आत्मीयतेचे नाते अधिक बळकट करत आहे.



विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम, सत्कार समारंभ, गृहप्रवेश, वाढदिवस, सामाजिक उपक्रम अशा विविध कार्यक्रमांमध्ये आ. सुरेश धस यांच्यासह सौ. प्राजक्ताताई धस, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास धस, युवा नेते जयदत्त धस, श्याम धस आणि सागर धस हे आवर्जून उपस्थित राहत आहेत. प्रत्येक कार्यक्रमात नागरिकांशी थेट संवाद साधत शुभेच्छा देणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देणे यामुळे धस कुटुंबाची जनाधाराशी असलेली नाळ अधिक मजबूत होत आहे.

राजकारणापलीकडचे सामाजिक नेतृत्व

राजकीय क्षेत्रात सक्रिय असतानाच सामाजिक बांधिलकी जपणारे नेतृत्व म्हणून आ. सुरेश धस यांची ◀◀ पान ३ वर

# जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीत सदस्यासाठी इच्छुक महिलांनी अर्ज सादर करावेत

बीड । प्रतिनिधी

महिला व बाल विकास विभाग केंद्र पुरस्कृत मिशन शक्ती योजनेच्या सबल या उपयोजनेअंतर्गत वन स्टॉप सेंटर तसेच सामर्थ्य या उपयोजनेअंतर्गत महिला सक्षमीकरण सेंटर व नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह- सखी निवास या घटक योजनेची जिल्हा स्तरावर संपूर्ण अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे.

महिला विकासाच्या विविध योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विविध जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती, बीड मध्ये महिलांसाठी काम करणाऱ्या दोन महिला सदस्यांची निवड करावयाची आहे. करीता सदर समितीमध्ये काम करु इच्छिणाऱ्या महिलांनी बीड जिल्हयात महिलासांठी काम करणाऱ्या महिलांनी बातमी प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बाबुराव वाघ हाईटस यांची इमारत, तिसरा मजला, नाट्यगृह रोड, बीड यांच्याकडे २ प्रतीत प्रस्ताव परिपुर्ण कागदपत्रासह सादर करावेत. सदर समितीवर काम करण्यासाठी सदस्यांना कोणतेही मानधन किंवा वेतन देय असणार नाही, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# मिनिकीट बियाणे वाटपासाठी अर्ज प्रक्रिया सुरू १५ मे पर्यंत अर्ज करा- विजयकुमार पवार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२६ अंतर्गत विविध योजनांमार्फत वितरित करण्यात येणाऱ्या मिनीकिट बियाण्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, इच्छुक शेतकऱ्यांनी १५ मेपर्यंत अर्ज करावेत, असे तालुका कृषी अधिकारी, अंबाजोगाई श्री. विजयकुमार पवार यांनी केले आहे.




राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांसाठी तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत तेलबिया पिकांसाठी अनुदानित बियाणे वाटप करण्यात येणार आहे. संबंधित योजनांमध्ये निर्धारित कालावधीतील अधिसूचित वाणांसाठी अर्ज करता येणार आहेत. प्रमाणित बियाणे वितरणासाठी ज्वारी, मका, सोयाबीन, तूर, मूग, उडीद आदी पिकांचा समावेश करण्यात आला आहे. लाभार्थी निवड "प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. शेतकऱ्यांनी महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबंधित कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अटी व शर्ती लागू राहतील. तसेच नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तसेच वैयक्तिक शेतकरी यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

# उष्माघातापासून सावध राहा ; नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून बीड जिल्ह्यात यंदा तापमानाने चाळिशी ओलांडल्याने प्रशासनाने उष्माघात प्रतिबंध आणि आपत्ती व्यवस्थापन मोहिमेला वेग दिला आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नागरिकांना दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडणे टाळावे , पुरेसे पाणी प्यावे आणि उष्माघाताची लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत , असे आवाहन केले आहे .बीड जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र सुमारे १० , ६९३ चौ . कि . मी . असून जिल्ह्यात ११ तालुके आणि १४०३ गावे आहेत . वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण आणि शहरी



भागात उष्णतेचा परिणाम अधिक जाणवत आहे . जिल्ह्याची लोकसंख्या २८ लाखांहून अधिक असून मोठ्या प्रमाणात शेती , बांधकाम , रस्ते कामे आणि मैदानी श्रमिक वर्ग उन्हाच्या संपर्कात राहत असल्याने आरोग्याचा धोका वाढत आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की , उष्माघात ही केवळ उन्हामुळे होणारी सामान्य समस्या नसून ती जीवघेणी ठरू शकते . प्रशासनाने सर्व विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत . आरोग्य , महसूल , ग्रामविकास , शिक्षण , कृषी , पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग समन्वयाने काम करत आहेत . त्यांनी नागरिकांना दुपारी १२ ते ४ या वेळेत अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर न पडण्याचा सल्ला दिला. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना उष्णतेशी संबंधित उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले आहेत . शासकीय कार्यालये , ग्रामपंचायती , प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था , सावलीची सोय आणि जनजागृती साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे . विविध विभागांमध्ये समन्वय राखून तातडीची प्रतिसाद यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यावर भर दिला जात आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने विशेष कृती आराखडा तयार केला आहे . जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून उष्माघातग्रस्त रुग्णांसाठी स्वतंत्र उपचार कक्ष , शीत कक्ष आणि आवश्यक औषधसाठा

दि जालना पिपल्स को-ऑप बँक लि.,जालनाचे
अध्यक्षपदी मा.श्री.सतीशजी पंच
तसेच उपाध्यक्षपदी मा.श्री.किशोरजी देविदान
यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल यांचे
हार्दिक अभिनंदन...!

दि जालना पिपल्स को-ऑप.बँक लि.,जालना
व्यापाऱ्यांची बँक, जनसामान्यांचा आधार!

मा. श्री. सतीशजी सितारामजी पंच - चेअरमन
मा. किशोर ओमप्रकाशजी देविदान - व्हाईस चेअरमन

आमची बांधितकी, तुमच्या प्रगतीची हमी!
ग्राहकांचा विश्वास, बँकेचा श्वास !
सहकारातुन समृध्दी, समृध्दीतुन समाजसेवा !
स्थिरता, विश्वास आणि विकास !
दुरदृष्टी नेतृत्व, उज्वल भविष्य !

आपल्या नेतृत्वातील बँकेची वाटचाल
* मजबुत आर्थिक पाया
* उत्तम सेवा, समाधानी ग्राहक
* आधुनिक बँकिंग, तंत्रज्ञानाचा वापर
* सामाजिक बांधिलकी आणि सहकार
* नवोपक्रमांची दिशा, प्रगतीची शिखरे

मोबाईल बँकींग सुविधा उपलब्ध
* आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी व आय.एम.पी.एस. सुविधा
* बिझनेस क्युआर कोड
* क्लिअरिंग स्टेटस सुविधा
* लोन रि-पेमेंट
* लवकरच यु.पी.आय व ए.टी.एम.सुविधा

"आपल्या प्रदीर्घ अनुभवातून आणि कुशल नेतृत्वातून बँक प्रगतीची नवीन शिखर पार करो, हीच सदिच्छा !"

संचालक मंडळ : संजय मुथा, संजय भरतीया, सुनिल चौधरी, सौ.सुनंदा अग्रवाल, ॲड.अनिल संचेती, राजकुमार दायमा, हितेंद्र शाह, अभय करवा, जयेश बावीशी, अनुराग अग्रवाल, सुनिल बियाणी, विरेंद्र धोका, सौ.वर्षा भक्कड, सुभाष वाघमारे, दिपक भुरेवाल, सी.ए.निखील बाहेती

अभिनंदनकर्ता : व्यापारी महासंघ व जालना होलसेल किराणा असोसिएशन

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नीट पेपरफुटीत सीबीआयच्या कारवाया गतीमान; महिलेनंतर पुण्यातून एका विद्यार्थ्याला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने गतीमान कारवायांना सुरुवात केली असून याप्रकरणात आणखी एका संशयित तरुणाला पुण्यातील फुरसुंगी येथून ताब्यात घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे सीबीआयने आजच पुण्यातील बिबडेवाडी येथून एका महिलेला अटक केली होती. त्या महिलेला सीबीआयच्या ताब्यात देण्यात येणार होते. त्यातच, आता आणखी एकास पुण्यातून (झींपिश) अटक करण्यात आली आहे. दुसरीकडे नाशिकमधील शुभम खैरनारच्या घरी जाऊन पोलिसांची झाडाझडती सुरू आहे. नीट प्रकरणातील चौकसाठी सीबीआयने आरोपी शुभम खैरनारच्या भावालाही ताब्यात घेतलं आहे.

नीट पेपर फुटीनंतर एनटीएने यंदाची ३ मे रोजी घेण्यात आलेली नीट २०२६ ची परीक्षा रद्द केली असून विद्यार्थ्यांना नव्याने परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यासंदर्भातील तारीख लवकरच जाहीर होईल. मात्र, एनटीएने परीक्षा रद्द करताच, सीबीआयने कारवाईला जोर दिला आहे. याप्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रातच सापडले असून नाशिकमधून दोघांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर, आज पुण्यातून एका महिलेला ताब्यात घेण्यात आलं आहे. नीटचं नाशिक कनेक्शन समोर आल्यानंतर पुणे पोलिसांनी आज पहाटे मनीषा वाघमारे या महिलेचा ताबा घेतला. संबंधित महिला ब्युटी पार्लर चालवत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ४६ वर्षीय मनिषा ही पुण्यातील बिबडेवाडी परिसरात राहत असून तिनेच विद्यार्थ्यांना आरोपीपर्यंत पोहोचविण्याचं काम केल्याचा संशय आहे. आता, इंजिनिअरींगच्या एका विद्यार्थ्याला पोलिसांनी अटक केली आहे. पुणे पोलिसांनी याप्रकरणात आणखी एका संशयित तरुणाला अटक केली आहे, पुण्यातील फुरसुंगी येथून युवकास ताब्यात घेण्यात आले. सबंधित विद्यार्थी हा इंजिनियरिंगच्या द्वितीय वर्षात शिकत असल्याची माहिती आहे. सध्या पोलिसांकडून त्याची चौकशी सुरू आहे, अद्याप त्याच्याकडून कुठलीही माहिती मिळालेली नाही. मात्र, चौकशीसाठी त्याला सीबीआयच्या ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती आहे.नीट परीक्षा गैरप्रकाराबाबत उइख ॲक्शन मोडवर असून नाशिकमधील आरोपी शुभम खैरनारच्या घरी जाऊन झाडाझडती घेण्यात आली. नांदगाव येथील घरी सीबीआय आणि नाशिक गुन्हे शाखेकडून तपास करण्यात आला असून अधिकाऱ्यांकडून कमालीची गोपनीयता पाळण्यात आली होती. या पथकात एका महिला अधिकाऱ्यांसह सात ते आठ सदस्यांचा समावेश होता. संशयित आरोपी शुभम खैरनार यांच्या कुटुंबातील सदस्यांचीही १ तासाहून अधिक वेळ चौकशी करण्यात आली. शुभमचा भाऊ भावेश खैरनार याला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून घरांची झाडाझडती आणि चौकशीनंतर त्याला सोडणार आहेत.




# पुण्यात घरगुती वादातून चाकूने हातावर, गळ्यावर सपासप वार; सुनेनं सासूला संपवलं

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात सुनेन सासूवर धारदार चाकूने वार करून संपवल्याची घटना घडली आहे. घरगुती वादातून (झींपिश उीळाश छशुी) ही घटना घडली असल्याची माहिती समोर आली आहे. कात्रज आंबेगाव बुद्रुकमधील ही धक्कादायक घटना आहे. मृत सासूचे नाव सुमन शिंदे वय वर्षे ८० तर आरोपी सुनेचे नाव अनुपमा शिंदे वय वर्षे ६० आहे, पोलिसांनी घटनेचा तपास करून आरोपी सुनेला ताब्यात घेतले आहे. या घटनेप्रकरणी भारती विद्यापीठ (झींपिश उीळाश छशुी) पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे. १२ तारखेला दुपारी दीड ते अडीच वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली आहे. घरगुती वादावरून चाकूने हातावर गळ्यावर वार करून सुनेने सासूचा खून केल्याची पोलिसांची माहिती. अधिक तपास भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन करत आहेत.

बेगाव बुद्रुक परिसरातील ही घटना कौटुंबिक वादातून घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सुनेने सासूचा चाकूने गळ्यावर वार करून निर्घृणपणे संपवल्याची घटना काल (मंगळवारी, ता १२) दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.(झींपिश उीळाश छशुी) पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेचे नाव सुमन शिंदे (वय ८०) असे असून आरोपी सुनेचे नाव अनुपमा संजय शिंदे (वय ६०) आहे. दोघीही आंबेगाव बुद्रुक येथील समृद्धी रेसिडेन्सीमध्ये राहत होत्या. मंगळवारी दुपारी दीड ते अडीच वाजण्याच्या सुमारास घरगुती कारणांवरून सासू-सुनेमध्ये जोरदार वाद झाला. हा वाद इतका वाढला की आरोपी अनुपमा शिंदे यांनी घरातील आपल्या सुनेला बेडरूममध्ये ढकलून बाहेरून कडी लावली. त्यानंतर त्यांनी स्वयंपाकघरातील चाकू घेत वृद्ध सासू सुमन शिंदे यांच्यावर हल्ला केला.

या हल्ल्यात सुमन शिंदे यांच्या गळ्यावर आणि हातावर सपासप वार करण्यात आले. गंभीर जखमी झालेल्या सुमन शिंदे रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपी अनुपमा शिंदे यांना ताब्यात घेतले आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# माऊलींच्या पालखी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर, पुण्यातील मुक्कामाचे ठिकाण ही ठरले, 'असा' असेल मार्ग

**पुणे प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे वेळापत्रक देवस्थानने जाहीर केलं आहे. यात पुण्यातील मुक्कामावर शिक्कामोर्तब करत सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. भवानी पेठेतच माऊलींच्या पालखीचा मुक्काम असणार आहे. विठोबा मंदिरालगतची जागा खरेदी करण्याच येणार आहे. शिवाय परिसरातील अतिक्रमण हटवून या ठिकाणी निर्माण होणाऱ्या गर्दीचा प्रश्न मार्गी लावला जाणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी तसं आश्वासन दिलं आहे. तशी प्रक्रिया ही सुरु झाली आहे, असा दावा आळंदी देवस्थानचे विश्वस्त आणि पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप यांनी केला आहे.

या वर्षीचा श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढीवारी आळंदी पंढरपूर पालखी सोहळा ८ जुलै २०२६ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. ८ जुलै रोजी पालखी प्रस्थान सोहळा संपन्न होईल. त्यानंतर पालखीचा मुक्काम आळंदीमध्ये राहील. ९ जुलै रोजी पालखी सोहळा आळंदीहुन पुण्याकडे मार्गस्थ होईल. ९ व १० जुलै असे दोन दिवस पालखी सोहळा पुणे येथे मुक्कामी राहील. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढीवारी आळंदी पंढरपूर पालखी सोहळ्याचे नियोजनावर विचारविनिमय करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर, पंढरपूर येथे विश्वस्त, दिंडी समाज, मानकरी, सेवेकरी आणि दिंडी प्रमुख यांची संयुक्त बैठक होत असते. ही बैठक २८ मार्च रोजी श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर, पंढरपूर येथे संपन्न झाली. या बैठकीत पुणे येथील मुक्कामाची जागा अपुरी पडत असल्याने पालखी सोहळ्याचे पुण्यातील मुक्कामासाठी अन्य पर्यायी जागांचा विचार करावा अशी सहमती झाली. त्यानुसार श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढवारी पालखी सोहळ्याचा पुणे येथील मुक्काम श्री पालखी विठोबा मंदिर भवानीपेठ येथे होत असतो. दिवसेंदिवस पालखी सोहळ्यातील सहभागी वारकऱ्यांची संख्या वाढत असल्याने तसेच भवानीपेठ येथील अपुरी जागा याचा विचार करून २०१० पासून पुण्यातील मुक्कामाचे ठिकाण बदलण्याची मागणी समाजाकडून होत होती. त्या वेळी पालखी सोहळ्याचा पुण्यातील मुक्काम रेसकोर्स मैदानावर हलवावा अशी सूचना समाजातून आली होती.पुढे २०२२ मध्ये संस्थानच्या तत्कालीन विश्वस्त मंडळाने श्री पालखी विठोबा मंदिर भवानीपेठ या संस्थेच्या विश्वस्त मंडळाबरोबर संस्थानच्या पुणे येथील कार्यालयात बैठक घेतली.




# येडगाव धरण परिसरात पुन्हा केबल चोरी, खंडोबामाळातील सहा शेतकऱ्यांचे कृषी पंप लक्ष्य

**नारायणगाव । प्रतिनिधी**

येडगाव धरण परिसरातील खंडोबामाळ येथे बुधवारी (दि. १३) पहाटेच्या सुमारास सहा शेतकऱ्यांच्या कृषी पंपांच्या केबलची चोरी झाल्याची घटना घडली. दोन दिवसांपूर्वीच गणेशनगर परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या केबल चोरीला गेल्या होत्या. व लाखो रुपयांचा फटका बसला. त्यानंतर पुन्हा खंडोबामाळ परिसरात चोरी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

केबल चोरी करणाऱ्या टोळीचा बंदोबस्त करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे. मागील साडेतीन महिन्यांतील या भागातील ही चौथी मोठी घटना असून शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. फेब्रुवारी २०२६ पासून आजअखेर येडगाव धरण जलाशयातील खंडोबामाळ व इंदिरानगर परिसरातील सुमारे शंभर कृषी पंपांच्या केबल चोरीला गेल्या आहेत. मात्र अद्याप केबल चोरट्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आलेले नाही. येडगाव परिसरातील इंदिरानगर, खंडोबामाळ व दोन देवळे या भागात सुमारे ५०० कृषी उपसा सिंचन योजना आहेत. रात्रीच्या वेळी चोरटे कृषी पंपांच्या तांब्याच्या तारा असलेल्या केबल चोरी करून त्या भंगार व्यवसायिकांना विक्री करत असल्याचे सांगितले जाते. या भागातील केबल चोरीचे सत्र नोव्हेंबर २०२० पासून सुरू असून एप्रिल २०२२ मध्ये नारायणगाव पोलिसांनी तीन अल्पवयीन मुलांसह ओतूर येथील भंगार व्यावसायिक गफूर शेख याला ताब्यात घेत सुमारे नऊ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. दरम्यान, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी खंडोबामाळ परिसरातील सुमारे ५५ कृषी पंपांच्या केबल चोरीला गेल्या होत्या. त्यानंतर ११ मे २०२६ रोजी इंदिरानगर परिसरातील ४० कृषी पंपांच्या केबल चोरीच्या घटना घडल्या.आता पुन्हा सहा शेतकऱ्यांच्या केबल चोरीला गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून तर काहींनी उधारीवर नवीन केबल खरेदी केल्या होत्या. मात्र काही दिवसांतच त्या पुन्हा चोरीला जात असल्याने आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे.पहाटे खंडोबामाळ परिसरातील राजेंद्र नेहरकर, समीर गावडे, माऊली शिंदे, बारकू शिंदे, रामदास ढमक आदी सहा शेतकऱ्यांच्या केबल चोरीला गेल्या. सकाळी फौजदार जगदेव पाटील व आदिनाथ लोखंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. दरम्यान संदर्भात सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण सपांगे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, परिसरात पोलिसांची रात्रीची गस्त वाढविण्यात आली असून स्थानिक तरुण व शेतकऱ्यांचीही मदत घेतली जाणार आहे. केबल चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांकडून कसोशीने प्रयत्न सुरू आहेत.



# लॉजची बंद रुम, ४ मुली नको त्या अवस्थेत, छापा टाकताच पोलिसही हादरले, पुण्यात कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या आंबेगावमध्ये गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. आंबेगावमधील एका लॉजवर गुन्हे शाखेने छापेमारी केली. या छापेमारीत हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे निदर्शनास आले. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली आहे. तर एजंटलाही अटक केली आहे. या मोठ्या कारवाईने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, आंबेगाव बुद्रुक परिसरातील एका लॉजमध्ये सुरू असलेल्या कथित वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने छापा टाकत चार पीडित महिलांची सुटका केली. या कारवाईत एका एजंटला अटक करण्यात आली आहे. सचिन बाबुराव गायकवाड (वय २८, रा. कोंढवा, पुणे) या एजन्टला ताब्यात घेण्यात आले.

गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली होती की, पुणे-सातारा रस्त्यावरील द्वारका लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग येथे महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक छगन कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने माहितीची पडताळणी केली. बनावट ग्राहकाच्या मदतीने खात्री झाल्यानंतर पोलिसांनी लॉजवर अचानक छापा टाकला. कारवाईदरम्यान लॉजमध्ये आणलेल्या चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली.



# भीमा सहकारी साखर कारखान्याच्या प्रशासकपदी प्रकाश जगताप, सहकार मंत्र्यांचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील भीमा सहकारी साखर कारखान्यांचे प्रशासकीय कामकाज पाहण्यासाठी जिल्हा उपनिबंधक (पुणे ग्रामीण) यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचे अंशतः बदल आदेश पुणे प्रादेशिक साखर सह संचालक नीलीमा गायकवाड यांनी दिले आहेत. याकामी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडील दाख अपिलातील आदेश, मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले आदेशान्वये मूळ आदेशामध्ये अंशतः बदल करुन हे आदेश दिनांक १२ मे रोजी जारी केले आहेत.

तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भीमा कारखान्याच्या प्रशासक समितीच्या बदलाची-पुनर्रचनेची प्रक्रिया दि.७ मे पासून एका आठवड्याच्या आत पूर्ण करण्यात यावी आणि त्यानंतर, पुढील दोन आठवड्यांच्या कालावधीत कारखान्याच्या व्यवस्थापक समितीच्या निवडणूकीचा कार्यक्रम सुरु करण्याचे आदेश उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती अमित बोरकर यांनी दिले. त्यादृष्टिने आवश्यक ती कार्यवाही व व्यवस्था दिलेल्या कालावधीत व कालमर्यादेत करावी, असेही साखर सह संचालकांनी आदेशात पुढे म्हटले आहे.

या बाबतची पार्श्वभूमी अशी की, भीमा कारखान्याचे अध्यक्ष हे भाजपचे आमदार राहुल कुल हे होते. भीमा कारखान्यांच्या सन २०१९-२०२४ या कालावधीसाठीच्या संचालक मंडळाची निवडणूक घेणेसाठी कारखान्याच्या एकूण ४९ हजार ४७५ पात्र सभासद संख्येनुसार अंदाजित निवडणूक निधी ६० लाख ११ हजार ४७५ रुपये भरणा करण्याबाबत वेळोवेळी कळविले असता फक्त २० लाख रुपये जमा केलेले आहेत. ही रक्कम निवडणूक घेण्यासाठी पुरेशी नाही. कारखान्याच्या संचालक मंडळाची मुदत संपली आहे. त्यावर पुणे प्रादेशिक साखर सह संचालक गायकवाड यांनी दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी समितीच्या रचनेत दोष निर्माण झालेला आहे व संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली असल्याचे नमूद करीत संचालक मंडळ बरखास्त केले. तसेच कारखान्याचे प्रशासकीय कामकाज पाहण्यासाठी तीन सदस्यांची समिती नियुक्त केली. आदेशाला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे शेतकरी तुकाराम ताकवणे-पारगांव यांनी आव्हान दिले असता त्यांनी दिनांक ७ मे रोजी दिलेल्या निकालात अपिलकर्ता यांचे अपिल (२४०/२०२६) अंशतः मंजूर करीत पुणे प्रादेशिक साखर सह संचालकांचा दि. २२ एप्रिल २०२६ रोजीचा आदेश रद्द केला. प्रतिवादी क्रमांक पाचचे भीमा सहकारी कारखान्यांवर कायद्यातील कलमांन्वये पात्र सभासदांचे प्राधिकृत मंडळ, प्राधिकृत अधिकारी यांचे विहित प्रक्रियेचा अवलंब करुन नियुक्ती साखर सहसंचालकांनी करण्याचे आदेश दिले. त्या आदेशास वसंतराव सांळुखे यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले असता भीमा सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापक समितीच्या निवडणूकीचा कार्यक्रम दोन आठवड्यांच्या कालावधीत सुरु करण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्यास अनुसरुनच भीमा कारखान्याच्या प्रशासकपदी प्रकाश जगताप यांच्या नियुक्तीचे आदेश काढण्यात आले आहेत.




# रुग्णालयाच्या परिसरात बॉम्बसदृश्य वस्तू आढळल्याने खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसर भागातील एका रुग्णालयाच्या आवारात बॉम्बसदृश्य वस्तू गुरुवारी आढळून आली. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, पुणे पोलिसांसह बीडीडीएस पथक आणि इतर यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. हा प्रकार नेमका काय आहे, याची तपासणी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात घटनेची नोंद करण्याचे काम सुरू होते. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित रुग्णालय हडपसरच्या मध्यवर्ती आणि वर्दळीच्या परिसरात आहे. रुग्णालयाच्या आवारात सायंकाळी खोक्यासारखे एक पार्सल आढळले होते. एका व्यक्तीने ते तेथे ठेवून निघून गेल्याचे सांगितले जात आहे. काही वेळानंतर हा प्रकार निदर्शनास आला. त्यानंतर बॉम्बसदृश्य वस्तू आढळल्याची माहिती परिसरात पसरताच एकच खळबळ उडाली.घटनास्थळी पोलिसांचे बीडीडीएस पथक, अग्निशमन दलाचे पथक, हडपसर पोलिस तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी धाव घेतली. संबंधित वस्तू ताब्यात घेऊन पथकाने ती मोकळ्या जागेत हलवली. नेमकी ती बॉम्ब आहे की अन्य काही वस्तू, याचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.


# पुण्यात उष्म्याने वीज केबल्स वितळल्या; कोंढव्यात १६ तास वीजपुरवठा खंडित

**पुणे । प्रतिनिधी**

विजेच्या वाढत्या मागणीमुळे गरम होणाऱ्या केबल्स आणि आग ओकणाऱ्या सूर्यामुळे केबल्स वितळून वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढीस लागले असून, गेल्या दोन दिवसांत पुणे परिमंडळातील वीज कर्मचाऱ्यांना तब्बल सात ठिकाणी केबलची दुरुस्ती करावी लागली आहे. कोंढव्यातील दुरुस्तीला विलंब झाल्याने या परिसरातील रहिवाशांना तब्बल १६ तास विजेविना अंधारात काढावे लागले.

उन्हाळ्यात एप्रिल व मे महिन्यात विजेची मागणी नेहमीच वाढते. पुणे परिमंडळातील वीज मागणी आता चार ते साडेचार हजार मेगावॅटवर गेली असून, मासिक वीजवापरही १७०० दशलक्ष युनिटवर पोहोचला आहे. विजेची मागणी वाढल्यामुळे वीजवहन करणाऱ्या ल्युमिनियमच्या वा कॉपरच्या तारांमध्ये उष्णता निर्माण होते. त्यामुळे त्यावरील रबर-प्लास्टिकचे आवरण तापते. त्या जोडीला वाढत्या तापमानाचाही त्यावर परिणाम होऊन कमकुवत झालेल्या ठिकाणी केबल बर्स्ट होतात किंवा अनेकदा जॉईंटवर त्या तुटतात, त्यामुळे उन्हाळ्यात केबल फॉल्टमध्ये वाढ होते, असे महावितरण कंपनीतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने स्पष्ट केले. पुणे परिमंडळातील पिंपरी, भोसरी, बाणेर, कोथरूड आणि कोंढवा येथे केबल फॉल्ट झाल्याची नोंद महावितरणच्या तक्रार निवारण केंद्रात केली आहे. कोथरूड येथे सोमवारी रात्री दोन ठिकाणी असे केबल फॉल्ट आले होते. बहुतेक ठिकाणी केबलमध्ये निर्माण झालेले हे बिघाड तीन-चार तासांतच दूर करण्यात कर्मचाऱ्यांना यश आले. कोथरूड येथे सोमवारी सकाळपासूनच विजेचा लपंडाव सुरू होता. कोथरूडमधील मयूर कॉलनी, कर्वे पुतळा परिसरात दुपारी तीन सव्वातीनच्या सुमारास वीजपुरवठा खंडित झाला. एक-दीड तासाने तो पूर्ववत झाला. परंतु, रात्री आठच्या सुमारास पुन्हा या परिसरात अंधार पसरला.

केबलमध्ये झालेला बिघाड दुरुस्त करण्यास रात्रीचे अकरा वाजले. अकराच्या सुमारास सर्व परिसरातील वीजपुरवठा पूर्ववत झाल्याचे महावितरण कोथरूडचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विष्णू माने यांनी दै. 'पुढारी'च्या प्रतिनिधीशी बोलताना स्पष्ट केले.



# ६५ वर्षीय महिलेचा पाय रस्त्यावरील उघड्या व्हॉल्वमध्ये अडकला; दोन तासांच्या थरारानंतर सुखरूप सुटका



**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडमधील काळेवाडी परिसरात एक धक्कादायक घटना घडली. स्मिता भागवत कासारे या ६५ वर्षीय महिलेचा पाय रस्त्यालगत असलेल्या पाईपलाईनच्या उघड्या व्हॉल्वमध्ये अडकला. त्यानंतर तब्बल दोन तासांच्या प्रयत्नानंतर त्यांची सुखरुप सुटका करण्यात आली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. या संपूर्ण घटनेत महिलेचा पाय गुडघ्यापर्यंत व्हॉल्वमध्ये अडकला होता. तब्बल दोन तासांच्या प्रयत्नांनंतर अग्निशमन दलाने अत्यंत काळजीपूर्वक त्यांची सुखरूप सुटका केली.